MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष एकोणिसावे / अंक ७ / जुलै २०१८

## संपादकीय

### 'विवेकतीर्थाची आनंदवारी!'

सध्या महाराष्ट्रात आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या अलोट वारकऱ्यांच्या 'ज्ञानबा-तुकाराम' या जयघोषाचे निनाद उमटत आहेत. 'पंढरपूरची आनंदवारी' सर्व जण अनुभवत आहेत. माध्यमांमध्ये 'माझा विठ्ठल-माझी वारी' अशा मथळ्याचे कार्यक्रम दाखवले जात आहेत. मात्र, चित्रपट सृष्टीतील एखाद्या कलाकाराने वारकऱ्याची वेशभूषा करून काही जुजबी प्रश्न वारकऱ्याला विचारून व कॅमेऱ्याच्या समोर 'विठ्ठल विठ्ठल' म्हणून सेल्फी काढून फक्त जनसामान्यांचे लक्ष वेधून घेता येईल. पण वारीच्या मागील वैचारिक पार्श्वभूमी काय हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. अर्ध्या तासाच्या कार्यक्रमात व टीआरपीच्या रेट्यामुळे वारीचे बहिरंग दर्शनच होते. 'माझा विठ्ठल-माझी वारी' या शीर्षकातील 'माझा' हे सर्वनाम म्हणून न वापरता एखाद्या माध्यमसमूहाचे नाव म्हणून त्याचा गजर होताना दिसतो. याप्रसंगी वारीच्या मागची पार्श्वभूमी वारकरी संप्रदाय व संतांचे कार्य समजून घेण्याला भरपूर जागा आहे.

प्रा. शं. बा. दांडेकर म्हणतात, ''आषाढी, कार्तिकी, माघी अथवा चैत्री यापैकी एका शुद्ध एकादशीस तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपुरास जातो तो पंढरपूरचा वारकरी म्हटला जातो व त्याच्या उपासनेचा जो मार्ग तो 'वारकरी पंथ' होय.'' 'वारी' या शब्दाच्या असंख्य व्युत्पत्ती सांगितल्या जातात. त्यापैकी 'वारी' या शब्दाचा अर्थ आपल्या आराध्य दैवताच्या दर्शनास यात्रा करणे म्हणजे वारी.' 'वारी' चा संस्कृत भाषेतील अर्थ 'पाणी' असा आहे. पाणी ज्याप्रमाणे अनेक नद्या व जलस्रोतांपासून शेवटी समुद्रास मिळते तद्वत् भक्तीचा जलप्रपात पांडुरंगरुपी समुद्राला जाऊन वारीच्या रुपात मिळतो असा अर्थ काढता येईल. ज्ञानेश्वरादी संतांच्या आधीपासून पंढरपूरचा विठोबा हे दैवत सर्वज्ञात होते. अनेक भाविक पांडुरंगाच्या दर्शनास येत. आदि शंकराचार्यांनी देखील पांडुरंगाच्या दर्शनास आल्यास 'पांडुरंगाष्टक' नावाचे एक सुंदर काव्य लिहिले आहे -

**'महायोग पीठे तटे भीमरथ्यां**
**वरं पुण्डलीकाय दातुं मुनिन्द्रैः**
**समागत्य तीष्ठं तमानंद कन्दं**
**प्रब्रह्म लिङ्गं भजे पांडुरंगम्।।**

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

अर्थात 'भीमरथी' चंद्रभागा नदीच्या तटी भक्तपुंडलीकाने केलेल्या आईवडिलांच्या सेवेवर प्रसन्न होऊन पांडुरंग 'युगे अठ्ठावीस' वीटेवर उभा आहे असे शंकराचार्य म्हणतात.

'वारकरी' संप्रदायाचे नाव 'वारी' या नावावरून पडले असल्याने वारीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. घरची कामधामं सोडून विनाकारण चालत फिरणे ही संसाराची पळवाट नसून प्रवासात जागोजागी भेटणाऱ्या प्रत्येक जीवाला पांडुरंग मानून आत्मासाक्षात्काराची प्रचीती घेणे म्हणजे वारी.

ज्ञानेश्वरांनी या संप्रदायाला १३ व्या शतकात मोठी वैचारिक व तात्विक बैठक बसवून दिली. ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी- अर्थात-भावार्थदीपिका', 'चांगदेवपासष्ठी', 'हरिपाठ', 'अमृतानुभव' व 'अभंगगाथा' इत्यादी ग्रंथांची रचना करून या संप्रदायाला वैचारिक अधिष्ठान दिले. बहिणाबाई म्हणतात -

**संतकृपा झाली। इमारत फळा आली।।**
**ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।**
**नामा तयाचा किंकर। तेणे केला हा विस्तार।**
**जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत।**
**तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।**

वरील अभंगात ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व तुकोबा यांच्या लोकोत्तर कामास उजाळा दिला आहे. या संत विचाराने महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीस खूप मोठी चालना मिळाली आहे. आचार्य अत्रे म्हणत की, 'महाराष्ट्राचा देव विठोबा, मोक्षपीठ पंढरपूर आणि आषाढी-कार्तिकीची वारी हाच महाराष्ट्रधर्म'. विठ्ठल म्हणजे ज्ञानियांचे श्रेय, ध्यानियांचे ध्येय, तपस्वियांचे तप, जपकांचे जाप्य, योगियांचे गौप्य आहे. वारीच्या मागची तात्विक बाजू ज्ञानेश्वरांनी खूप सुंदर शब्दात ज्ञानेश्वरीत सांगितली -

**'पाठी महर्षि येणे आले। साधकाचे सिद्ध जाहले।**
**आत्मविद् थोरावले। येणेची पंथे।।**

अर्थात याच भक्तिमार्गावर महर्षी, सिद्ध, साधक चालत चालत आत्मविद्याविशारद झाले. तत्कालीन कर्मकांडांविरुद्ध बंड करून सर्वजनांच्या भक्तीची विवेकवाट चालने म्हणजे वारी - 'जनातील देव शोधत प्रत्येकाच्या मनातील देवत्वाला आवाहन करणे म्हणजे वारी' असं रामचंद्र देखणे म्हणतात.

ज्ञानेश्वरांनी वारी मागील भक्तीयोग मोठ्या गोड शब्दात सांगितला.


**जे जे भेटीजे भूत। ते ते मानीजे भगवंत।।**
**हा भक्तीयोग निश्चित। जाण माझा।।**

भक्तीची याहून सुटसुटीत व्याख्या आजवर कोणी केली नसावी. जी व्यक्ती भेटेल, जे 'भूत' अर्थात प्राणी, पक्षी, लता, वेली, जड, चेतन वस्तू त्यात परमेश्वर विराजमान आहे हे मनात ठसवणे म्हणजे भक्ती. 'योगयागादी कर्मकांडाविरुद्ध ज्ञानेश्वरांनी बंड केलं आहे. 'म्हणोनि भक्ती गा एकसरे। जाती अप्रमाण।।' अशी हाक त्यांनी दिली. परमेश्वर प्राप्तीचा हक्क अखिल मानव जातीला असून भक्तीप्रेमावीण ज्ञान म्हणजे अभिमानाचे नवे द्वार आहे असा संतांचा विचार आहे.

'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' या अद्वितीय ग्रंथात ज्येष्ठ अभ्यासक गं. बा. सरदार लिहितात -

''ज्ञानेश्वरांची समन्वयदृष्टी ही त्यांच्या जीवितकार्याशी सुसंगत आहे. दलितोद्धार हे त्यांच्या कार्याचे एक प्रमुख अंग होते. महाराष्ट्रातील शुद्रातिशुद्रांच्या धर्मश्रद्धेला तत्त्वजिज्ञासेची जोड द्यावी, त्यांची धर्मसाधना डोळस व अंतर्मुख बनवावी म्हणून ज्ञानेश्वरांनी मराठीतून ग्रंथरचना केली.

(पृष्ठ क्र.३९ वर)




व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष एकोणिसावे/अंक ७/जुलै २०१८



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक १ ला)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | प्रा. प्रशांत पु. धर्माधिकारी | |
| २) | बेल्ट अँड रोड परियोजना: चीनचे एक धाडसी पाऊल | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | शास्त्रवेध-०८ सूर्य संपावर गेला तर | श्री. नरेंद्र गोळे | ७ |
| ४) | ओळख वनस्पतींची - कॉर्डिया | श्री. प्रकाश दुधाळकर | १० |
| ५) | फ्रान्सचा महान सुपूत्र नेपोलियन | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १२ |
| ६) | स्वरांजली : पुष्प ४ थे : 'ऋतू' हिरवा | डॉ. कल्पिता मुळये<br>डॉ. जयश्री पवार | २४ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २८ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक


# बेल्ट अँड रोड परियोजना : चीनचे एक धाडसी पाऊल

*आपल्या आजूबाजूला असलेल्या देशांची प्रगती करण्याच्या इराद्याने चीनने बेल्ट अँड रोड (Belt and Road) ही परियोजना आखली आहे. या योजनेची माहिती सदर लेखात दिलेली आहे – संपादक*

अलीकडच्या काळात चीनने चांगलीच प्रगती केली आहे. या देशाच्या आर्थिक प्रगतीचा आलेख मागील चार–पाच दशकांमध्ये सतत वाढत राहिला आहे. आज अनेक यंत्रांचे निर्मिती केंद्र म्हणून या देशाकडे बघितले जाते. चीनमध्ये बनविलेल्या वस्तू जगाच्या वेगवेगळ्या देशांत निर्यात केल्या जात आहेत. जपान पाठोपाठ चीनने जागतिक बाजरपेठ काबीज केली आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. भारतात चिनी बनावटीच्या अनेक वस्तू मिळतात. हीच स्थिती अनेक प्रगत आणि अप्रगत देशांची आहे. अमेरिकन बाजारपेठ चिनी बानावटीच्या वस्तूनी ओसंडून वाहत आहे. त्यामुळे चीनची आर्थिक बाजू बळकट झाली आहे. एवढी की, चीन हा सध्या दुसऱ्या क्रमांकाचा आर्थिक महासत्ता झाला आहे. या सत्तेच्या जोरावर ते आता इतर अनेक देशांना मदत देऊ शकतात किंवा त्यांची आर्थिक कोंडी करू शकतात.

आर्थिक बाजू बळकट झाल्यावर चीनने युरोप आणि आशिया या खंडांमध्ये पुढारीपण मिळविण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या. शेजारील राष्ट्रांमध्ये जाऊन दळणवळणाच्या सुविधा सुधारण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. याचे एक मूर्तीमंत उदाहरण म्हणजे श्रीलंकेमध्ये चीनने बांधलेले महामार्ग. या देशात त्यानी तीन महामार्ग बांधले. असेच कार्य ते इतर अनेक देशांत करीत आहेत. या प्रयत्नांना मोठे स्वरूप देण्यासाठी त्यानी बेल्ट अँड रोड या परियोजनेची (Belt and Road Initiative) सुरुवात केली. सप्टेंबर २०१३ मध्ये कज़ाकिस्तान येथे भरलेल्या एका आंतरराष्ट्रीय सभेमध्ये चीनच्या राष्ट्रपतीनी या योजनेची घोषणा केली. या योजनेचे खरे स्वरूप समजण्यासाठी चीनचा इतिहास समजून घेणे आवश्यक आहे.

चीन ही भारतासारखीच एक प्राचीन संस्कृती आहे. या संस्कृतीने जगाला बऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत. कागदाची निर्मिती याच देशात झाली असे सांगतात. बंदुकीची दारू चिनी तंत्रज्ञांनी पहिल्यांदा बनविली अशी विज्ञानाच्या इतिहासात नोंद आहे. चीनची आणखी एक महत्त्वाची निर्मिती म्हणजे रेशीम. हे रेशीम खरेदी करण्यासाठी युरोप आणि पश्चिम आशियातील व्यापारी चीनमध्ये येऊ लागले. ते ज्या मार्गाने ये–जा करत असत तो रेशीम पथ (Silk Route) म्हणून ओळखला जात असे. खालील चित्रात रेशीम पथ दाखविला आहे. यावरून आपल्याला कल्पना येईल की, हा पथ चीनबरोबरच भारत, इराण, पाकिस्तान, अफगाणिस्तान अशा अनेक देशांतून जात असे. कालांतराने दळणवळणाच्या अनेक सुविधा निर्माण झाल्या. त्यामुळे रेशीम पथाचा वापर कमी होऊ लागला. म्हणून या पथाचे पुनरुज्जीवन करण्याचे चीन सरकारने ठरविले.




**रेशीम पथ**

अंधारच नसता तर चमकणाऱ्या ताऱ्यांना काही किंमतच उरली नसती.

रेशीम पथात येणाऱ्या परिसराला त्यांनी बेल्ट (Belt) असे संबोधायला सुरुवात केली. या बेल्टमध्ये आशिया तसेच युरोप खंडातील अनेक देशांचा समावेश आहे.

रेशीम पथ प्रामुख्याने जमिनीवर होता. केवळ तेवढ्याच मार्गाचे पुनरुज्जीवन करून आपला उद्देश सफल होणार नाही हे चिनी राज्यकर्त्यांनी ओळखले. म्हणून त्यांनी सागरी मार्ग देखील शोधून काढला. पूर्वीच्या काळी चीनची जहाजे सागरी मार्गाने वेगवेगळ्या देशांत जात असत. परंतु नंतर मात्र त्यांनी या मार्गाचा फारसा वापर केला नाही. आज खुष्कीच्या मार्गाबरोबरच सागरी मार्गालादेखील तेव्हढेच महत्त्व आले आहे. याचे कारण एका देशातील उत्पादन दुसऱ्या देशात पाठवायचे असेल तर सागरी मार्ग स्वस्त पडतो. विशेषतः खनिज तेलाचा पुरवठा प्रमुख्याने सागरी मार्गानेच होतो. म्हणूनच चीनने जमिनीवरील मार्गाबरोबरच सागरी मार्गाची देखील आखणी केली. सागरी मार्गाला त्यांनी रोड म्हणून संबोधायला सुरुवात केली. अशा पद्धतीने जमिनीवरील रेशीमपथ आणि समुद्रातील सागरीपथ मिळून बेल्ट अँड रोड परियोजना तयार करण्यात आली आहे. खालील चित्रातून या योजनेचा आवाका आपल्या लक्षात येईल.




**बेल्ट अँड रोड योजनेचा आवाका**

बेल्ट अँड रोड ही खूपच मोठी योजना आहे. एवढ्या मोठ्या स्तरावर आतापर्यंत जगात एकही योजना राबविण्यात आलेली नाही. ज्या ज्या देशांमधून खुष्कीचे आणि सागरी मार्ग जातात त्या त्या देशांना बेल्ट आणि रोड ही परियोजना लागू करण्यात आली आहे. त्यामुळे एकूण देशाची संख्या ६५ एवढी मोठी आहे. त्यामध्ये मध्य आशिया, दक्षिण आशिया, दक्षिण पूर्व आशिया, मध्य पूर्वेतील देश याबरोबरच मध्य युरोप, पूर्व युरोप आणि पश्चिम युरोपचा देखील समावेश होतो. याखेरीज बेल्ट अँड रोड योजनेत आफ्रिका खंडातील देशांचाही समावेश होतो. लोकसंख्येच्या दृष्टीने विचार करता या योजनेत जगाच्या ६० टक्के लोकसंख्येचा समावेश होतो. अशी ही महाकाय योजना आहे.

बेल्ट अँड रोड ही एक बहुआयामी योजना आहे. यामध्ये प्रामुख्याने समावेश आहे तो दळवळण सुविधांचा विकास. जमिनीवर चांगले रस्ते बांधले की एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे सहज शक्य होते हे चीनने जगाला दाखवून दिले आहे. म्हणून महामार्ग बांधण्यावर या योजनेत भर दिलेला आहे. त्याचबरोबर या योजनांतर्गत लोहमार्ग देखील बांधले जाणार आहेत. एक रेलगाडी शेकडो व्यक्तिंना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अतिशय अल्प खर्चात नेते. जर वेगाने चालणाऱ्या रेलगाड्या असतील तर पैशाबरोबरच वेळेची देखील बचत होते. अशा रेलगाड्या चीनमध्ये यशस्वीपणे चालविल्या जात आहेत. मी स्वतः बेजिंग ते शांघाय हा १३८१ किलोमीटरचा प्रवास केवळ ४ तास ४८ मिनिटांत पूर्ण केला आहे. महामार्ग तसेच रेलमार्ग याबरोबरच बेल्ट अँड रोड योजनेत सागरी मार्गाचा देखील सामावेश आहे. समुद्रमार्गाने आलेले सामान उतरवून घेण्यासाठी किंवा जमिनीवर असलेले सामान जहाजात चढविण्यासाठी माल-धक्क्यांची गरज असते. असे मालधक्के जागोजागी बांधण्याचे काम हे देखील बेल्ट अँड रोड योजनेत सामाविष्ट केलेले आहे. त्याचबरोबर ज्या देशांत खनिज तेलाचे उत्पादन होते तेथून ज्या देशांना त्याची गरज आहे या दोन देशांमध्ये

पाईपलाईन टाकणे याही बाबीचा सदर योजनेत समावेश आहे. खालील चित्रात या परियोजनेच्या अशा अनेक कामांचा ऊहापोह केलेला आपल्याला दिसेल.




**बेल्ट अँड रोड योजनेतील विविध कामे**

वरील चर्चेवरून वाचकांच्या लक्षात आलेच असेल की, बेल्ट अँड रोड ही आर्थिकदृष्टीने खूपच खर्चिक अशी योजना आहे. तिचा अंदाजे खर्च ८ लाख कोटी अमेरिकन डॉलर (8 Trillion US dollars) एवढा आहे. या कामी चीन त्यांच्याकडे असलेली शिल्लक रक्कम वापरणार आहे. ज्या देशासाठी योजना राबविली जाईल त्या देशाने काही आर्थिक भार उचलावा अशी अपेक्षा आहे. त्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद त्या देशाकडे असली तर चांगलेच. जर अशी तरतूद नसेल तर चीन त्या देशाला कर्ज उपलब्ध करून देईल. हे कर्ज दीर्घ मुदतीचे असून त्याचा व्याजदर देखील कमी ठेवला जाईल. या कामी चीनच्या अधिकाऱ्यांनी काही बँकांशी बोलणी देखील केलेली आहे. गरज पडल्यास नवीन बँक काढली जाईल. कसेही करून ही योजना राबवायचीच असे चिनी अधिकाऱ्यांनी ठरविलेले आहे.

परियोजनेच्या आराखड्याकडे नजर टाकली की युरोप आणि आशिया या खंडांतील देशांसाठी ती एक संजीवनी आहे असे कोणालाही वाटेल. बेल्ट आणि रोड मधील अनेक देशांना असेच वाटते आहे. त्यांनी या परियोजनेचे स्वागत केले आहे. या परियोजनेला विरोध फक्त दोनच देशांचा आहे. त्यातील एक देश आहे जपान. अलीकडच्या काळात चिनी राजकारण्यांनी जपानच्या ताब्यात असलेल्या काही बेटांवर आपला हक्क सांगितला आहे. म्हणून चीनच्या योजनेला त्यांचा विरोध आहे. विरोध करणारा दुसरा देश आहे भारत. पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या काश्मीरमधून चीन एक मोठा रस्ता बांधत आहे. या कार्याला भारताने विरोध दर्शविला आहे. बेल्ट अँड रोड या परियोजनेच्या निमित्ताने चीन अशा प्रकारची आणखी काही कामे करण्याची शक्यता आहे. म्हणून भारताचा या परियोजनेला विरोध आहे.

बेल्ट अँड रोड ही परियोजना म्हणजे चीनने अलीकडच्या काळात टाकलेले एक धाडशी पाऊल आहे. यात त्या देशाला फायदा जसा आहे, तसाच धोका देखील आहे. या योजनेत सामाविष्ट होणारे अनेक देश त्यांचाकडील कर्जाची परतफेड करतील की नाही याची खात्री नाही. तरीही चीनने एवढी धाडशी योजना का आखली असावी? असा प्रश्न पडणे साहजिक आहे. या प्रश्नाचे उत्तर शोधणे फारसे कठीण नाही. १९७८ ला चीनने निर्यातीवर आधारित आर्थिक योजना आखली. त्यासाठी त्यांनी देशात प्रथम अनेक सुविधा निर्माण केल्या. देशभर महामार्ग बांधले, रेल्वेचे जाळे निर्माण केले, विमानतळे बांधली, मालधक्के बांधले. यासाठी लागणारे सिमेंट आणि लोखंड ते निर्माण करू लागले. जोपर्यंत देशात त्याची गरज होती तोपर्यंत ते उत्पादन देशातच वापरले जायचे. आता ती सगळी कामे संपत आली आहेत. त्यामुळे कारखान्यात निर्माण होणारे सिमेंट आणि लोखंड पडून राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याला वाट करून देणे आवश्यक आहे. समस्या केवळ कच्च्या मालाची नाही तर ती कामगारांचीदेखील आहे. देशात प्रचंड प्रमाणावर

आयुष्यातील काही गोष्टी कब्बडीच्या खेळाप्रमाणे असतात. तुम्ही यशाच्या रेषेला हात लावताच लोक तुमचे पाय पकडायला सुरुवात करतात.

बांधकाम चालू असताना मोठ्या संख्येने कामगार वर्ग तयार झाला. आता त्यांच्यावर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळण्याची शक्यता आहे. ते होण्याआधीच त्यांच्यासाठी नवीन काम निर्माण करणे आवश्यक झाले आहे.

बेल्ट अँड रोड परियोजना आखण्यामागचे आणखी एक कारण विचारवंत मांडत असतात. मागील चार दशकात चीनमध्ये कारखानदारी मोठ्या प्रमाणावर वाढली. यात होणारे उत्पादन चीनला परदेशी पाठवावे लागते. त्याचबरोबर त्यांना खनिज तेलाची आयात करावी लागते. ही आयात-निर्यात सागरी मार्गाने होते. समुद्रात अनेक ठिकाणी अमेरिकेची नाविक स्थळे आहेत. सध्या चीन आणि अमेरिका यांचे संबंध सलोख्याचे आहेत. त्यामुळे अमेरिकन नाविक दलाकडून त्यांना संरक्षण मिळते. ही स्थिती सदान्कदा अशीच राहील याची खात्री देता येत नाही. अलीकडच्या काळात या दोन देशांमध्ये मतभेदाचे वारे वाहू लागले आहेत. ते जर प्रबळ झाले तर देशाच्या निर्यातीवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे याची जाणीव चिनी विचारवंतांना आहे. त्यावर वेळीच मार्ग काढणे त्यांना गरजेचे वाटते. एकदा का बेल्ट अँड रोड ही परियोजना यशस्वी झाली तर जमिनीबरोबरच समुद्रावर देखील चीनचे अधिराज्य निर्माण झालेले असेल.

बेल्ट अँड रोड परियोजनेचे स्वरूप बघता ती प्रामुख्याने राजकीय योजना असावी असे वाटते. परंतु चिनी विचारवंतांनी ती शालेय स्तरावर देखील राबविण्याची योजना आखली आहे. शाळकरी मुलांसाठी नवनिर्मितीची संधी (Opportunity for Innovation) असे या योजनेचे स्वरूप आहे. या योजनांतर्गत पहिले शिबिर (Innovation Camp) चीनची राजधानी बेजिंग येथे डिसेंबर २०१७ मध्ये भरविण्यात आले होते. या योजनेत समाविष्ट होणाऱ्या सर्वच देशांतील प्रतिनिधींना या शिबिरासाठी पाचारण करण्यात आले होते. शिबिराचे आयोजन चीन विज्ञान तंत्रज्ञान संघटनेने (China Association of Science and Technology) केले होते. याच संघटनेने आयोजित केलेल्या कास्टिक (CASTIC: China Adolescent Science and Technology Innovation Contest) या स्पर्धेत विद्या प्रसारक मंडळाच्या सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थी मागील दहा वर्षांपासून सहभागी होत आहेत. त्याच संघटनेच्या निमंत्रणावरून या शाळेतील पाच विद्यार्थी बेल्ट अँड रोड शिबिरात सहभागी झाले होते. त्या शिबिरातील अनुभवांवर आधारित स्वतंत्र लेख लिहिण्याचा मानस आहे.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

•••

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# शास्त्रवेध-०८ सूर्य संपावर गेला तर

*जर सूर्य नसेल तर जीवन संभवतच नाही. सूर्याची महिती या लेखात विशद केली आहे- संपादक*

सूर्याचे एक नाव आहे 'दिनमणी'. दिन म्हणजे दिवस. मणी हा शब्द तेजोगोल ह्या अर्थाने वापरला आहे. दिवसा साऱ्या सृष्टीला दृश्यमान करणारा, 'तम निशेचा' संपविणारा, आणि साऱ्या चराचरांना ऊर्जेचा अविरत पुरवठा करणारा तो 'तेजोनिधी लोहगोल' आहे. सजीवांना जगण्यासाठी अन्नाची गरज असते. वातावरणातील पाणी व कर्ब-द्वि-प्राणिल यांच्या प्रकाश-संश्लेषणाद्वारे वनस्पती प्राथमिक अन्न तयार करतात. प्रकाशाचा मूळ स्रोत अर्थातच सूर्य. इथे हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की, सजीवांचा जीव-की-प्राण असलेल्या प्राणवायूचे पुनर्विमोचनही याच प्रकाश-संश्लेषण प्रक्रियेत होत असते. अशाप्रकारे सजीवांना प्राणवायू पुरविण्याचे कामही तो सूर्यच अप्रत्यक्षरित्या करीत असतो. सजीवांना पाण्याची नितांत गरज असते. ऋतुचक्र फिरते ठेवून सप्तसिंधूंचे पाणी सजीवांना सोपविण्याची सोयही तो सूर्यच करतो. यावरून स्पष्टपणे जाणवते ते हेच की, जीवनाचे दुसरे नाव सूर्यच असावे. जर सूर्य नसेल तर जीवन संभवतच नाही.



संप ही प्रतिष्ठितांविरुद्ध कष्टकऱ्यांनी करावयाच्या संघर्षाची एक संकल्पना आहे. रशियन राज्यक्रांती नंतरच्या समाजवादी युगात, संप ही संकल्पना रूढ झाली. मालकांकरवी आपल्या उचित मागण्या मान्य करवून घेण्यासाठी, विहीत काम करण्यास संघटीतपणे नकार देण्याचा हा हक्क आधुनिक जगाने मान्य केला. वारंवार क्रांतीची गरज भासू नये म्हणून, असहाय्य कामगारांनी, सशक्त व्यवस्थापनाशी, संघर्ष करण्याचा सनदशीर मार्ग म्हणजे संप.

सर्व सृष्टीची उलाढाल ज्याचे ऊर्जेविना अशक्य आहे तो सूर्य असहाय्य नाही, अशक्त तर नाहीच नाही. त्याला सृष्टीविरुद्ध संप जर करावयाचा असेल तर तेवढी सृष्टी सशक्त नाही. शिवाय आपले म्हणणे कुणी मान्य करावे ह्यासाठी सूर्य सृष्टीवर अवलंबून नाही. म्हणून 'सूर्य संपावर गेला तर.....' हे शीर्षकच विसंगत आहे. 'सूर्यावाचून जीवन' असा एक अर्थ त्यापासून काढता येईल व तशी कल्पना करता येईल. पण मग खरा प्रश्न तर हा असेल की, 'सूर्यावाचून जीवन ...., किती काळ?' ह्या प्रश्नाची अनेक उत्तरे संभवतात. या शीर्षकाशी सुसंगत निबंध लिहायचा असेल, तर त्या उत्तरांचाच ऊहापोह करावा लागेल.

महाभारतीय युद्धात अभिमन्यूनी रणांगणावर देह ठेवल्यानंतरचा दिवस. एक प्रहर दिवस शिल्लक असतानाच सूर्य मावळतो. अभिमन्यूचा शेवट अन्यायाने करणाऱ्यांना शासन करण्यास असमर्थ ठरलेला अर्जुन अग्निकाष्ठे भक्षण करण्यास सिद्ध होतो. हे असंभव दृश्य सदेह साजरे करण्यासाठी स्वत: जयद्रथ युद्धभूमीवर प्रकट होतो. आणि काय आश्चर्य, सुदर्शन चक्रापाठी अदृश्य झालेला सूर्य कृष्णलीलेने दीप्तीमान होतो. मग काय! 'हा सूर्य

अन् हा जयद्रथ' असे कृष्णाने अर्जुनास सांगताच जयद्रथाचा वध होतो. अन्यायाचे परिमार्जन होते. काही काळच सूर्य अदृश्य होण्याचा हा किस्सा जगद्‌विख्यात आहे. यात सूर्य अदृश्य होण्याचा निव्वळ आभास घडविलेला आहे. एरव्हीही सूर्याच्या अभावातच त्याच्या प्रभावाची जाणीव आपल्याला सदैव होत असते.

चंद्राच्या पाठीमागे सूर्य दडतो तेंव्हा सूर्यग्रहण होते. काही काळच का होईना पण सूर्य (पूर्णत: किंवा अंशतः) दिसेनासा होतो. या काळात अज्ञात आकाशस्थ वस्तू, ज्या एरव्ही प्रखर सूर्यप्रकाशात दिसत नाहीत, त्या दिसू शकतात. अशा वस्तूंचा वेध घेण्याची संधी मिळते. म्हणूनच आजकाल ग्रहणांचा अभ्यास केला जातो. अशाप्रकारे काही काळ सूर्य (पूर्णत: किंवा अंशतः) दिसेनासा होण्याने खगोलशास्त्रात नवे शोध लागू शकतात.

वैशाखवणवा संपतासंपता मौसमी वारे सिंधूसागरावरून काळ्याकुट्ट ढगांची फौज देशावर घेऊन येतात. रात्रीच काय पण दिवसाही दिसेनासे होते. भर दिवसा आकाशात सूर्य कुठे असावा हे सुद्धा सांगता येत नाही. दिवसचे दिवस, किंबहुना आठवडे-आठवडे सूर्यदर्शन होत नाही. सूर्याच्या नसण्याने काय होते त्याचे वर्णन करण्याची मुळी गरजच उरत नाही. प्रत्येकाला सूर्य कधी उगवेल याचीच भ्रांत पडलेली असते. कारण, कारण ..... धुतलेले कपडे सुकत नाहीत. वातावरणातली वाढलेली आर्द्रता श्वसनाच्या रोगांचे भांडार उघडते, जसे की सर्दी, दमा वगैरे वगैरे. रस्तोरस्ती तुंबलेले पाणी चिखलात रूपांतरित होत असते, तर आजूबाजूची डबकी डासांच्या पैदाईशीची माहेरघरेच बनतात. माशांचे काफीले घराघरांवर आक्रमण करतात. कोकणात उडत्या पाखरांच्या पंखांनाही शेवाळं फुटावं अशी परिस्थिती असते. आणि म्हणूनच या साऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सूर्याची अतिशय निकड भासू लागते. सूर्याच्या अभावाने नरक वाटू लागणारा परिसर, मग त्याच्या प्रभावानेच स्वर्गवत होऊ लागतो. सूर्य प्रकटताच रोगराई आपला पसारा आवरू लागते, डास, माशांना पुढील पर्वणीची वाट बघावी लागते. रस्ते सुकून कोरडे पडतात. धुतलेले कपडे वाळू लागतात. पिके जोमाने वर येतात. अन् सुगीचे दिवस येतात.

मात्र बराच काळ सूर्य नसला तर पृथ्वीवर हाहा:कार उडेल. दैनंदिन ऊर्जेची आवक थांबेल. ऊर्जेचा जमवलेला साठा हळूहळू, पण निश्चित स्वरूपानी कमी होत जाईल. मौसमी वाऱ्यांना खीळ बसेल. ऋतुचक्र थांबेल. दिनचर्या, रात्रंदिन, अहर्निश हे शब्द अर्थहीन होतील. ध्रुवप्रदेशाप्रमाणे भलीमोठी रात्रच काय ती शिल्लक उरेल. अंतत: तिथल्या प्रमाणेच सारी सृष्टी निर्जीव व बर्फमय होईल.

हे असे जर असेल तर, सूर्य नकोसा वाटेल असे कधी होऊ शकेल काय? हो! अशाही परिस्थितीची कल्पना करता येईल. आजही असे अनेक प्रदेश आहेत जिथे उन्हाळा कमालीचा तापतो. मग कविवर्य 'अनिल' वर्णन करतात 'केळीचे सुकले बाग' अन् 'कशी करू तुज सावली, माझ्या प्रितीच्या फुला' असा त्यांना प्रश्न पडतो. कवियत्री इंदिरा संतांना 'वर आकाशी सूर्याची भट्टी तापली, तापली' ह्या वास्तवाचे वर्णन करावे लागते. जमिनीला तडे पडतात. जो सूर्य एरव्ही सप्तसिंधुंतून आपल्यासाठी पाणी आणतो तोच सूर्य दिन प्रतिदिन साठलेले पाणीही आकाशात उडवून लावतो. सारी सजीव सृष्टी पाण्यावाचून तडफडू लागते. अन् मग वाटतं की नको हा सूर्याचा ताप. अशावेळी कल्पना करा की, दर दिवशी सकाळी ११ ते दुपारी ४ सूर्याने जर वामकुक्षी घेतली तर किती बरे होईल! तुम्ही विश्वास ठेवणार नाही. पण सध्यातरी हे खरेच शक्य आहे. भर उन्हाळ्यात उटीला जाऊन रहा. सूर्य माथ्यावर यायचाच अवकाश की आकाश ढगांनी भरून येईल. पावसाचा शिडकावा वातावरण कमालीचे गार करील. अन् त्यावर इंद्रधनुष्ये विखुरण्यासाठी पुन्हा सूर्य आकाशात तळपू लागेल. यावरून एक वेगळेच वास्तव उघडकीस येईल. मानवाला स्वर्ग वाटेल असे वातावरण सूर्यच निर्मितो. पण ते सृष्टीवर जिथे असते तिथे सारेच लोक मात्र राहू शकत नाहीत. दैव, दैव म्हणतात ते हेच तर नाही?

---

आपण चंदन असल्याची घोषणा चंदनाला कधीच करावी लागत नाही.
त्याचा गंध वाऱ्याबरोबर आपोआप पसरत जातो.

स्वर्गसमकक्ष सृष्टी सजते कधी? तर ऋतुचक्र पूर्ण होताना! हिवाळा, ऊन्हाळा, पुन्हा पावसाळा अशाप्रकारचे ऋतुचक्र पूर्ण होते तेंव्हा सुगीचे दिवस येतात. स्वच्छ कोरडी हवा, ऊबदार सूर्यप्रकाश, भरपूर पाणी व विपुल अन्नधान्य यांनी सृष्टी संपन्न असते. स्वर्ग सृष्टीवर अवतरतो. आणि हो, हा स्वर्ग साऱ्यांनाच उपभोगता येतो. म्हणूनच 'सूर्य संपावर गेला तर ......' काय होईल ह्या निष्फळ चिकित्सेत उगाच न गुंतता 'सूर्य सजीवांना धार्जिणा होतो तेंव्हा ......' म्हणजेच ऋतुचक्र पूर्ण होताना हिवाळ्यात, माणसे सण अन् उत्सवांत रमून जातात. अन् हीच या शीर्षकास समर्पक साठा उत्तरांची कहाणी नव्हे काय?

सूर्य पुरवू द्या सार जीवनासी ।
प्राणवायू अन् अन्न सजीवांसी ।।
ऋतुचक्रही सदैव फिरवू दे तो ।
इथे जो तो स्तोत्रेच त्याची गातो ।।

**संदर्भ**

१. 'लेखणीतील शाई' या प्रशांत मनोहर यांच्या अनुदिनीवर मला अत्यंत सुरेख सूर्यवर्णन सापडले ते असे :

रथस्यैकं चक्रं भुजगयमिता सप्तसुरगः ।
निरालम्बो मार्गः चरणविकलः सारथिरपि ।।
रविर्यान्तेवान्तं प्रतिदिनमपारस्य नभसा।
क्रियासिद्धिर्सत्वे महति महतां नौपकरणे ।।

म्हणजे :

रथा घोडे साती असुनि अंधही मार्ग क्रमती ।
रथा एकाचक्री अधू अरुण तो नेत गगनी ।।
तरीही आकाशा दरदिन सुखे पार करुनी ।
वदे कार्ये लाभे, महति न मिळे साधनतळी ।।

अर्थ : सूर्याच्या रथाला एक चाक, सात आंधळे घोडे व पांगळा सारथी आहे. असं असूनही आकाशातलं अमर्याद अंतर, खंड न करता सूर्यदेव दररोज पार करतात. तात्पर्य, थोर माणसे कार्यसिद्धीच्या कसोटीला उतरतात, त्यामुळेच त्यांना थोरपणा प्राप्त होतो. त्यांच्या जवळील साधनांमुळे नव्हे.

२. श्री रामदास स्वामीकृत श्रीसूर्यस्तुती

जयाच्या रथा एकची चक्र पाहीं ।
नसे भूमी आकाश आधार काहीं ।।
असे सारथी पांगुळा ज्या रथासी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। १ ।।

करी पद्म माथां किरीटी झळाळी ।
प्रभा कुंडलांची शरीरा निराळी ।।
पहा रश्मी ज्याची त्रिलोकास कैसी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। २ ।।
सहस्रद्वये दोनशे आणि दोन।
क्रमी योजने जो निमिषार्धतेन।।
मना कल्पवेना जयाच्या त्वरेसी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ३ ।।

विधीवेदकर्मास आधारकर्ता ।
स्वधाकार स्वाहादी सर्वत्र भोक्ता ।।
असे अन्नदाता समस्तां जनांसीं ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ४ ।।

युगे मंत्रकल्पांत ज्याचेनि होती ।
हरिब्रह्मरुद्रादी त्या बोलिजेती ।।
क्षयांतीं महाकाळरूप प्रकाशी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ५ ।।

शशी तारका गोउनी जो ग्रहांते ।
त्वरें मेरू वेष्टोनियां पूर्वपंथें ।।
भ्रमे जो सदा लोक रक्षावयासी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ६ ।।

समस्तां सुरांमाजी तूं जाण चर्या ।
म्हणोनीच तू श्रेष्ठ त्या नाम सूर्या ।।
दुजा देव तो दाखवी स्वप्रकाशीं ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ७ ।।

(पृष्ठ क्र. ११ वर)

आपले लक्ष्य, साध्य विसरू नका. अन्यथा जे काही मिळाले
तेवढ्यावरच संतुष्ट राहण्याची सवय लागेल.

# ओळख वनस्पतींची
## कॉर्डिया

*'कॉर्डिया' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, अनेक झाडे अशी आहेत जी इतर देशांतून आणलेली असली तरी आपल्या अंगभूत गुणांमुळे ती येथील मातीत चांगलीच रुळली आहेत. एवढी की आता सांगूनही कुणाला खरे वाटत नाही. काही झाडे तर येथील पशूपक्षी व किटकांनीही स्वीकारली आहेत. अर्थात अशा झाडांची संख्या कमी आहे. माणसांनी स्वीकारली तरी जोपर्यंत येथील पशुपक्षी व कीटक त्या झाडांचा स्वीकार करीत नाही तो पर्यंत ती झाडे येथील पर्यावरणाला पूरक आहेत असे म्हणता येत नाही. केवळ आपल्या सौंदर्यामुळे येथील उद्यानातून व बागांमधून स्थान मिळालेली अनेक झाडे आता आपलीच वाटू लागली आहेत. त्यात एक आहे कॉर्डियाचे. हा दक्षिण अमरिकेचा मूळ निवासी असलेला एक छोटेखानी वृक्ष आहे. उंची साधारण सात ते आठ मीटरपर्यंत. उंच सरळ खोड व सर्व बाजूंनी विस्तारलेल्या फांद्या. यामुळे याला छान उभट गोलाकार आकार प्राप्त होतो. याच्या हृदयाकृती १७ ते १८ सें.मी. लांबीच्या पानामुळे याचे नाव पडले आहे कॉर्डिया. तळहाताएवढ्या आकाराच्या पानांची रचना एकांतरीत असून वरील भाग खरबरीत असतो. अगदी सँडपेपरसारख्या या झाडाला सर्वत्र लोकप्रिय करण्याचे काम केले आहे यांच्या वैशिष्ट्यपूर्ण फुलांनी. ५ सें.मी. व्यासाची सहा ते सात पाकळ्या असलेली, पाकळ्यांच्या कडा झालरयुक्त अन् सुरकुतलेल्या. टोकाकडे काहीशा खोलगट होत कडा पुनः वरच्या बाजूला उचललेल्या. एका पेल्यासारख्या नळीच्या तोंडावर या पाकळ्या विसावलेल्या असतात. पेल्याच्या मध्यातून बाहेर आलेले पांढऱ्या पिवळ्या रंगाचे सहा पुंकेसर व त्यांच्या मधोमध असलेले पण पेल्याच्या आतच लपून बसलेला स्त्री-केसर. फुले सुंदर व नाजूक अन् पाने तेवढीच जाडसर व खडबडीत स्पर्शाची. गर्द हिरव्या पोपटी पार्श्वभूमीवर ती सुंदर फुले फारच उठून दिसतात.



कॉर्डिया आपल्याला बहुदा दोन रंगात दिसतो. एक गर्द लाल रंगाचा अन् दुसरा शेंदरी, केशरी रंगाचा. तिसरा प्रकार पांढऱ्या रंगाचा. पण हा प्रकार फारच क्वचित पाहावयास मिळतो. कॉर्डिया हा वर्षभर फुलणारा वृक्ष आहे. त्यामुळेच बागांमधून शोभेचे झाड म्हणून त्याने मानाचे स्थान मिळविले आहे. मार्च ते मे मध्ये मात्र हा भरभरून फुलतो. फांद्यांच्या टोकाशी येणारे फुलांचे गुच्छ फुलले की सारा परीसर तो आपल्या सौंदर्याने भारून टाकतो. ही फुले दीर्घकाळ टिकणारी असतात. तसेच जुनी फुले गळली तरी त्यांची जागा घेण्यात नवीन फुले सदैव तयारच असतात. त्यामुळे कॉर्डियाचे झाड फुलांशिवाय फार क्वचितच दिसते. याला पिअरसारखी ३ ते ४ सें.मी. लांबीची फळे येतात. या फळांना सुंदर वास असतो. फळांची चव मात्र तेवढी

---

आपले सत्यस्वरूप सिद्ध करण्यास सोन्याला अग्नीत शिरून दिव्य करावे लागते
व हिऱ्याला घणाचे घाव सोसावे लागतात.

खास नसते. मुळातच हा बाहेरून आलेल्या वृक्ष असल्याने येथील पशू-पक्ष्यांनी अजून तो स्वीकारल्याचे दिसत नाही. कारण याची फळे खातांना कुणी प्राणी किंवा पक्षी अजून तरी मी पाहिलेला नाही. तसेच याच्या औषधोपयोगी गुणाबद्दलही फारशी माहिती अवगत नाही. सध्यातरी एक शोभेचे झाड म्हणूनच लोक याला ओळखतात.

या झाडाची लागवड बीयांपासून तसेच फांद्या कापून त्याद्वारे करता येते. या झाडाची फारशी मिजास नसल्याने खूप सकस जमिनीची आवश्यकता नाही. सर्व साधारण जमिनीत ते होऊ शकते. मात्र या झाडाला भरपूर सूर्यप्रकाश हवा. या झाडाला भारतीय नाव अजून तरी मिळालेले दिसत नाही. कॉर्डिया याच नावाने ते सर्वत्र ओळखले जाते. तसेच याच्या रंगाप्रमाणे स्कार्लेट कॉर्डिया , यलो कॉर्डिया किंवा कॉर्डिया सुपरबा या नावाने ते ओळखले जाते. याचे शास्त्रीय नाव आहे Cordia Sebestena.

एक सदाहरित व सदैव फुलांनी स्वागत करणारे झाड म्हणून उद्यानातून, तसेच गृहनिर्माण संस्थांच्या आवारात, तसेच घरासमोरील बागेत लावण्यासारखा एक सुंदर वृक्ष म्हणून कॉर्डियाला सर्वत्र मागणी आहे. सुरुवातीला पाणी देण्याची गरज असली तरी झाड दोन वर्षाचे झाले की नियमित पाणी देण्याची गरज भासत नाही. फारशी मेहनत न घेता झाडांची हौस भागविण्यासाठी अनुकूल असेच हे झाड आहे. शिवाय आकारही खूप मोठा होत नसल्याने जागा मोजकीच लागते.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी : ९८६९५४१९६६
Email : dudhalkar@gmail.com

•••

(पृष्ठ क्र. ९ वरून - **शास्त्रवेध-०८ सूर्य संपावर गेला तर)**

महामोह तो अंधकारास नाशी ।
प्रभा शुद्ध सत्त्वाची अज्ञान नाशी ।।
अनाथा कृपा जो करी नित्य ऐसी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ८ ।।

कृपा ज्यावरी होय त्या भास्कराची ।
न पाहू शके शत्रू त्याला विरंची ।।
उभ्या राहती सिद्धी होऊन दासी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ९ ।।

फळे, चंदने आणि पुष्पे करोनी ।
पुजावें बरे एकनिष्ठा धरोनी ।।
मनी इच्छिले पाविजे त्या सुखासी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। १० ।।

नमस्कार साष्टांग बापा स्वभावे ।
करोनी तया भास्करालागी घ्यावे ।।
दरिद्रे सहस्रादी जो क्लेश नाशी।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। ११ ।।

वरी सूर्य आदित्य मित्रादी भानू ।
विवस्वान इत्यादिही पादरेणू ।।
सदा वांच्छिती पूज्य ते शंकरासी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।। १२ ।।

३. सूर्य संपावर गेला तर http://
urjasval.blogspot.in/2009/08/blog-post.18.html

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

आयुष्यात काही करून दाखवायचे असेल तर आपण काय आहोत, यापेक्षा आपण काय होऊ शकतो?
याचा विचार करायला हवा, जगात अशक्य काहीच नसतं.

# फ्रान्सचा महान सुपूत्र नेपोलियन

**भाग २**

*महान सेनापती, कुशल प्रशासक व श्रेष्ठ राजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या फ्रान्सच्या नेपोलियन ह्या सम्राटाविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

स्पेनने नेपोलियनच्या द्विकल्पीय प्रणालीच्या विरोधात अशातऱ्हेने बंड केले व त्याचा कित्ता युरोपमधील इतर राष्ट्रांनीदेखील गिरवला. फ्रान्सचा (नेपोलियनचा) कट्टर शत्रू ऑस्ट्रीयाने देखील फ्रान्सविरुद्ध बंड केले. त्यामुळे नेपोलियनला ऑस्ट्रीयावर चढाई करणे क्रमप्राप्त होते. त्याप्रमाणे फ्रेंच सैन्य व ऑस्ट्रीयन सैन्यामध्ये वाग्रम (Wagram) येथे जुलै १८०९ मध्ये लढाई झाली. हे ठिकाण ऑस्ट्रीयाची राजधानी व्हिएन्ना पासून जवळच आहे. वाग्रमच्या लढाईत फ्रेंच सैन्याने ऑस्ट्रीयन सैन्याचा पराभव केला. १८१० मध्ये नेपोलियनच्या खाजगी आयुष्यात एक महत्त्वाची घटना घडली व ती म्हणजे नेपोलियनने त्याची सम्राज्ञी जोसेफाईन हिला घटस्फोट दिला. असे म्हटले जाते की, जोफाईनचे अनेक व्यक्तींसोबत प्रेमसंबंध होते! त्यापैकीच एक बारास हा देखील होता. परंतु नेपोलियनने जोसेफाईनला घटस्फोट देण्याचे मुख्य कारण म्हणजे त्याला तिच्यापासून अपत्य होत नव्हते व नेपोलियनला आपल्या विशाल साम्राज्यासाठी एक उत्तराधिकारी (राजपुत्र) हवा होता. त्यामुळे नेपोलियनने जोसेफाईनशी आपले विवाह संबंध संपुष्टात आणले. येथे एक गोष्ट नमूद करावी लागेल व ती म्हणजे, जोसेफाईनचा पूर्वीच्या काळात बुरबाँ राजघराण्यातील व्यक्तींशी संबंध आलेला असल्यामुळे तिला राजदरबारातील वेशभूषा तसेच राजशिष्टाचार याविषयी चांगलीच माहिती होती व त्याचा नेपोलियनला सम्राट झाल्यावर आपला दरबार चालविताना निश्चितपणे फायदा झाला. जोसेफाईनला घटस्फोट दिल्यानंतर नेपोलियनने ऑस्ट्रीयाचा तत्कालीन राजा दुसरा फ्रान्सिस (Francis II) ह्याची कन्या व ऑस्ट्रीयन राजकुमारी मारी लुई (Marie Louise) हिच्याशी शाही विवाह केला. मेरीचा जन्म १२ डिसेंबर १७९१ साली झाला होता. तर नेपोलियनचा जन्म १५ ऑगस्ट १७६९ रोजी झाला होता. याचा अर्थ मारी नेपोलियनपेक्षा जवळ जवळ बावीस वर्षांनी लहान होती. १८१० साली मारी व नेपोलियनचा विवाह झाला व २० मार्च १८११ रोजी नेपोलियनला मारीपासून पुत्ररत्न झाले. ह्या मुलाचे नाव नेपोलियन फ्रँकॉइज् चार्ल्स जोसेफ बोनापार्ट (Napoleon Francois Joseph Bonaparte) असे ठेवण्यात आले. नेपोलियनचा हा पुत्र इतिहासात दुसरा नेपोलियन (Napolean II) म्हणून देखील प्रसिद्ध आहे. नेपोलियनने आपल्या ह्या पुत्राला रोमचा राजा (King of Rome) हा किताब दिला. मात्र, हा नेपोलियन पुत्र अतिशय अल्पायुषी ठरला. कारण तो २२ जुलै १८३२ रोजी वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी मृत्यू पावला.

ऑस्ट्रीयाचा जुलै १८०९ मध्ये वाग्रमच्या लढाईत पराभव केल्यानंतर नेपोलियनने आपला मोर्चा फ्रान्सचा अजून एक दीर्घकालीन स्पर्धक व शत्रू (निदान - १८ व्या शतकाच्या शेवटी व १९ व्या शतकाच्या सुरुवातीस) असलेल्या रशियाकडे वळवला. रशियाचा येथे फ्रान्सचा शत्रू म्हणून उल्लेख करण्याचे कारण म्हणजे १७८९ ची फ्रेंच राज्यक्रांती सुरू झाल्यापासून युरोपमधील ज्या विविध देशांनी फ्रान्सविरुद्ध युती वा आघाडी करून हल्ले केले होते अशा अनेक फ्रान्स विरोधी आघाड्यांमध्ये रशिया सामील होता. रशियाला नेपोलियनच्या खंडीय /

महाद्वीपकल्पीय प्रणालीची (Continental System) आर्थिक झळ बसण्यास सुरुवात झाली होती व फ्रान्स व रशिया ह्या देशांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यातच रशियाने देखील महाद्वीपकल्पीय प्रणाली झुगारून देण्यास सुरुवात केली. त्यामुळे नेपोलियनने रशियावर हल्ला करण्याचे ठरविले व त्याने सहा लक्ष (६,००,०००) एवढे प्रचंड सैन्य घेऊन जून १८१२ मध्ये रशियावर हल्ला चढविला. नेपोलियनने नेमन (Neman) नदी ओलांडून रशियात आपल्या सेनेसह प्रवेश केला. नेमन नदी ही बेलारुसमध्ये उगम पावते व उत्तरेकडे लिथुआनियात क्लेपेडा (Klaipeda) येथे बाल्टीक समुद्रास जाऊन मिळते. ॲलिटस (Alytus - लिथुआलिया), कोनस (Kaunas - लिथुआलिया), ग्रोन्डो (Grondo– बेलारुस, ह्या शहराला ऱ्होन्डा (Hronda) असे देखील म्हणतात), सोव्हेट्स्क (Sovetsk – १९४६ पूर्वी ह्या शहराला टिलसिट – Tilsit) असे म्हटले जात असे ही नेमन नदीवरील काही प्रसिद्ध शहरे होत. ह्या लढाईदरम्यान रशियाने अतिशय खुबीने माघार घेण्याचे तंत्र वापरून फ्रेंच सैन्याला जेरीस आणले. त्यामुळे नेपालियनला रशियाच्या सैन्यासोबत समोरासमोर उभे ठाकून सुरुवातीच्या काळात तरी लढाई करण्याची संधीच रशियनांनी दिली नाही. ते सतत माघार घेत राहिले व माघार घेताना सर्व गावे व शेती जाळून टाकण्याचा सपाटा लावला (Scorched Earth). त्यामुळे रशियन सैन्य माघार घेत मागे सरकत चालले आहे व फ्रेंच सैन्य हळूहळू पुढे जात असताना त्यांना जळत असलेल्या गावांतून व शेतांतून पुढे मार्गक्रमण करावे लागत आहे असे विचित्र चित्र त्यावेळी दिसावयास मिळत होते. रशियन सैन्याच्या ह्या खेळीमुळे फ्रेंच सैन्याला रसद गोळा करणे कठीण झाले/पडत होते. त्यातच रशियात हिवाळ्याची सुरुवात झाल्यामुळे फ्रेंच सैन्यावर उपासमारीची व गारठून जाण्याची पाळी आली. रशियातील हिवाळे तर कडक थंडीसाठी जगप्रसिद्ध आहेतच व हिवाळ्यात तेथील वातावरण अनेकदा शून्य सेल्सिअसच्या खाली जाते. कारण रशिया उत्तर ध्रुवाच्या जवळ असलेला देश आहे. सप्टेंबर १८१२ मध्ये शेवटी नेपोलियनचे फ्रेंच सैन्य व रशियन सैन्य यांच्यात रशियाची राजधानी मॉस्कोजवळील बोरोडिनो (Borodino) ह्या ठिकाणी लढाई झाली. ह्या लढाईत फ्रेंच व रशियन सैन्यातील सैनिक मोठ्या प्रमाणात ठार झाले. परंतु कुठलीही बाजू निर्णायकरित्या जिंकली असे म्हणता आले नाही. नेपालियनने ह्या लढाईत अनेक सैनिक गमावूनसुद्धा मॉस्को शहरापर्यंत मुसंडी मारली. परंतु त्याचा पूर्णपणे भ्रमनिरास झाला. कारण रशियनांनी ह्या शहरातून देखील माघार घेतली होती व नेपोलियनचे स्वागत जळणाऱ्या मॉस्को शहराने केले होते. एवढी प्रचंड तुंबळ लढाई होऊन व अनेक सैनिक गमाविल्यानंतर देखील रशियाचा झार (राजा) काही लढाईतून माघार घेत नव्हता व आपला पराजय मान्य करत नव्हता. त्यामुळे शेवटी ऑक्टोबर १८१२ मध्ये नेपोलियनने आपल्या उरल्या सुरल्या सैन्यासह मॉस्कोतून म्हणजेच रशियातून माघार घेण्यास सुरुवात केली. नेपोलियन माघार घेत असतानाच त्याच्या दमून गेलेल्या सैन्याला बर्फाच्या वादळांनी व कडाक्याच्या थंडीने चांगलेच झोडपून काढले व त्यातच रशियन कोझॅक (Cossack) सैनिकांनी भरकटलेल्या फ्रेंच सैनिकांचा खातमा करण्यात सुरुवात केली. असे म्हटले जाते की, नेपालियन रशियावर चढाई करताना सहा लक्ष सैनिक घेऊन गेला होता; परंतु ह्या लढाई दरम्यान जवळ जवळ पाच लक्ष फ्रेंच सैनिक त्याला मृत्यूमुळे, रणांगण सोडून गेल्यामुळे वा शत्रू पक्षाने पकडल्यामुळे गमवावे लागले. अर्थात, महाद्विपकल्पीय युद्धाप्रमाणेच नेपोलियनला ह्या रशियन मोहीमेमुळे देखील न भूतो न भविष्यती असा तडाखा दिला असे म्हणणे वावगे ठरू नये.

अशा तऱ्हेने नेपोलियनची रशियन मोहिम

फसल्यामुळे व त्याला ह्या स्वारी दरम्यान लाखो सैनिक गमवावे लागल्यामुळे त्याची युरोपभर चांगलीच नाचक्की झाली वा पत कमी झाली. ह्या सर्व प्रकारामुळे आता नेपोलियनच्या वा फ्रान्सच्या शत्रू राष्ट्रांनी पुन्हा एकदा फणा उभारला व ते फ्रान्सविरुद्ध एकत्र येऊन सरसावले. यातूनच इंग्लंड, ऑस्ट्रीया, रशिया, प्रशिया व स्वीडन ह्या राष्ट्रांनी फ्रान्सविरुद्ध चौथी आघाडी उघडली. सुरुवातीच्या काळात नेपोलियनने ह्या मित्र राष्ट्रांच्या सैन्याचा (इंग्लंड, ऑस्ट्रीया, रशिया, प्रशिया व स्वीडन) पराभव केला. परंतु ऑक्टोबर १८१३ च्या लिपझीकच्या लढाईत (Battle of Leipzig – लिपझीक हे तत्कालीन प्रशियाच्या पूर्वेकडील सॅक्सनी ह्या प्रांतातील एक शहर होय) शत्रू पक्षाने नेपोलियनचा पराभव केला. त्यामुळे नेपोलियनने रणांगणातून माघार घेतली व तो पॅरिसमध्ये परत आला. मात्र, शत्रूने त्याचा पॅरिसपर्यंत पाठलाग केला व मार्च १८१४ मध्ये त्याला पॅरिसमध्ये पकडून ताब्यात घेतले. नेपोलियनने शेवटी ११ एप्रिल १८१४ रोजी आपल्या राजेपदाचा त्याग केला व मित्र राष्ट्रांनी नेपोलियनला भूमध्य सागरातील एल्बा (Elba) ह्या बेटावर हद्दपार केले.

नेपोलियनला १८१४ साली फ्रान्समधून हद्दपार केल्यावर इंग्लंड आदी राष्ट्रांनी बुरबाँ घराण्यातील फ्रेंच क्रांतीकारकांनी १७८९ च्या क्रांतीनंतर देहदंड दिलेल्या १६ व्या लुईचा भाऊ अठरावा लुई (Louise XVIII) याला फ्रान्सच्या राजगादीवर बसवून त्याला फ्रान्सचा राजा घोषीत केले. परंतु फेब्रुवारी १८१५ मध्ये नेपोलियन एल्बा बेटावरून पळ काढण्यात यशस्वी झाला व त्याने पुन्हा एकदा फ्रान्सची राजगादी हस्तगत केली व अठराव्या लुईला बेल्जियम मध्ये आश्रय घेण्यास भाग पाडले. नेपोलियन जरी पुन्हा एकदा फ्रान्सचा राजा होण्यास यशस्वी ठरला असला तरी त्याला ह्या खेपेस फार दीर्घकाळ राज्य करता आले नाही. ह्यावेळेस त्याची सत्ता अवघी शंभर दिवस टिकली. आता फ्रान्सच्या शत्रू राष्ट्रांना नेपोलियनची, फ्रान्समधील सत्ता टिकू द्यावयाची नव्हती. यातूनच नेपोलियनचे फ्रेंच सैन्य व इंग्लंड व प्रशियाचे सैन्य यांच्यात १८ जून १८१५ रोजी इतिहास प्रसिद्ध अशी वॉटरलूची लढाई (Battle of Waterloo) झाली. ह्या लढाई दरम्यान इंग्लंडच्या सैन्याचे नेतृत्व आर्थर वेलस्लीने तर प्रशियाच्या सैन्याचे नेतृत्व ब्लुकरने (Blucher) केले. वॉटरलू हे ठिकाण फ्रान्सच्या ईशान्येकडील (उत्तरेकडील) शेजारील राष्ट्र बेल्जियममध्ये आहे. वॉटरलूच्या लढाईत पराभव झाल्यावर नेपोलियनने पुन्हा एकदा माघार घेऊन पॅरिस गाठले व २२ जून १८१५ रोजी पुन्हा एकदा राजेपदाचा त्याग केला. ह्यावेळी नेपोलियनने शत्रूच्या कचाट्यातून सुटण्यासाठी अमेरिकेला (अमेरिकेची संयुक्त संस्थाने) निसटण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. ब्रिटिशांनी /इंग्रजांनी त्याला ताब्यात घेऊन दक्षिण अटलांटिक महासागरातील सेंट हेलेना (St.Helena) ह्या ओसाड बेटावर पाठवून देऊन कैदेत ठेवले. शेवटी नेपोलियन ह्या जगप्रसिद्ध व इतिहास प्रसिद्ध योद्धयाचा ५ मे १८२१ रोजी वयाच्या ५२ व्या वर्षी कॅन्सरमुळे मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूबद्दल अनेक मतप्रवाह आहेत. त्यापैकीच एक मतप्रवाह असा आहे की, नेपोलियनवर विष प्रयोग करण्यात आला असावा! परंतु अनेक इतिहासकारांचे असे म्हणणे आहे की, त्याचा मृत्यू कॅन्सरमुळे झाला होता. १८४० मध्ये ब्रिटिश व फ्रेंच सरकारांच्या परस्पर सहकार्याने नेपोलियनच्या अस्थी पॅरिसमध्ये आणण्यात आल्या. अशाप्रकारे जगातील एका महान योध्याचा व वादळाचा कैदेत जीवाला अतिशय चटका लावण्यासारखा अंत झाला. कारण नेपोलियनसारख्या रणांगणावर शौर्य गाजविणाऱ्या वीराला कैदखान्यात मृत्यू यावा यापेक्षा मन विषण्ण करणारी दुसरी कोणती गोष्ट असावी!

नेपोलियन नेहमी म्हणत असे की, चांगला सेनापती होण्यासाठी व्यक्तीला अगोदर एक चांगला नागरिक

अनेक वेळा चांगले क्षण/ आशीर्वाद हे कठोर प्रसंगांच्या वेशभूषेत येतात.

असावे लागते. नेपोलियनची कीर्ती त्याने लढायांमध्ये मिळविलेल्या विजयांमुळे नव्हे तर त्याने फ्रान्समध्ये घडवून आणलेल्या चिरकालीन प्रशासकीय सुधारणांमुळे आहे असे आपणास मान्य करावे लागेल. त्याने प्रस्थापित केलेले विशाल साम्राज्य अस्त पावले; परंतु त्याने फ्रान्समध्ये घडवून आणलेल्या अनेक सुधारणा अजूनही टिकून आहेत. नेपोलियनने १७९९ साली सत्तेवर आल्यापासून १८१४ एवढ्या १५ वर्षांच्या कालावधीत फ्रान्समध्ये प्रशासकीय सुधारणा घडवून त्या देशाची प्रशासकीय घडी व्यवस्थित केली व लोकांना एका सक्षम, कार्यक्षम व लोकाभिमुख प्रशासनाची भेट दिली. त्यामुळे त्याची सामान्य जनतेमध्ये प्रचंड लोकप्रियता होती व त्यामुळेच त्याला प्रेमाने 'फ्रेंच राज्यक्रांतीचे अपत्य' (Child of the Revolution) म्हटले जात असे. याचाच अर्थ असा होतो की, फ्रेंच जनतेने ज्या इच्छा अपेक्षांनी उठाव केला होता त्या सर्वांची पूर्तता नेपोलियनने फ्रान्सचा शासक बनल्यावर केली. १७८९ च्या क्रांतीपूर्वी फ्रान्समधील जनतेची स्थिती अतिशय दयनीय व शोचनीय होती. सामान्य जनतेला व प्रामुख्याने शेतकरी वर्गाला चर्चशी संबंधीत व्यक्तिंना/वर्गाला (क्लर्जीज् – Clergies), उमराव व सरंजामदारांना, तसेच राजाला अशा तीन प्रकारच्या लोकांना कर द्यावा लागत असे. तसेच सामान्य जनतेचे व्यक्तिस्वातंत्र्य जवळ जवळ हिरावून घेतलेले होते. देशाची आर्थिक स्थिती बिकट होती. बुरबाँ राजघराण्याचे लोक व राजा-राणी उधळपट्टी करण्यात मश्गुल होते. कुठल्याही व्यक्तिला विनाचौकशी व विनाकारणही अटक करून तुरुंगात डांबले जात असे. अशा प्रकारचे अनागोंदीचे वातावरण क्रांतीपूर्व फ्रान्समध्ये होते व याला कंटाळूनच फ्रेंच जनतेने बुरबाँ राजघराण्याच्या विरोधात क्रांती करण्याचे पाऊल उचलले होते. नेपोलियन सत्तेवर आल्यानंतर त्याने आपल्या सत्तेचा उपयोग लोक-कल्याणासाठी केला व त्याने फ्रान्समधील अगोदर वर्णिलेली परिस्थिती पुरेपूर सुधारण्याचा प्रयत्न केला, नव्हे त्याने फ्रान्सची राजकीय, सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय स्थिती बऱ्याच अंशी सुधारलीसुद्धा. त्यामुळेच नेपोलियन हा फ्रेंच जनतेमध्ये कमालीचा लोकप्रिय होता व त्यामुळेच त्याला 'फ्रेंच राज्यक्रांतीचे अपत्य' असे संबोधले जाते.

नेपोलियनने आपल्या कारकिर्दीत फ्रान्सची प्रशासकीय यंत्रणा मजबूत करण्यावर भर दिला. त्याने केंद्रीय सत्ता बळकट करत असतानाच स्थानिक पातळीवरदेखील योग्य व कुशल प्रकारची प्रशासकीय यंत्रणा असेल याची खबरदारी घेतली. तसेच नेपोलियनने प्रत्येक महानगरपालिकेमध्ये महापौर पद देखील निर्माण केले.

१७८९ साली फ्रान्समध्ये क्रांतीची सुरुवात झाल्यावर फ्रान्समधील अनेक सधन व उमराव/सरंजामदार कुटुंबांनी फ्रान्समधून पलायन करून शेजारील राष्ट्रांमध्ये आश्रय घेतला होता. नेपोलियनने अशा स्थलांतरितांना फ्रान्समध्ये बोलावून घेतले. अशी स्थलांतरित कुटुंबेच प्रामुख्याने फ्रान्सच्या शेजारील राष्ट्रांना फ्रान्सविरुद्ध कटकारस्थाने करण्यासाठी फितवीत असत. त्यामुळे नेपोलियनने फ्रान्समधून अशा स्थलांतरित झालेल्या फ्रेंच उमरावांना फ्रान्समध्ये परत येण्याचे आवाहन केले व त्यांनी जर त्यांची स्थावर मालमत्ता विकली नसेल तर ती त्यांना परत देण्याचे वचनदेखील नेपोलियनने त्यांना दिले. नेपोलियनने फ्रान्समधील कायदा सुव्यवस्था स्थितीदेखील सुधारली. प्रामुख्याने पश्चिम व दक्षिण फ्रान्समध्ये लुटारू व बंडखोरांनी धुमाकूळ घातला होता. नेपोलियनने ही स्थिती सुधारली व लोकांच्या मनातील आत्मविश्वास उंचावून सुरक्षिततेची भावना निर्माण केली.

नेपोलियनने फ्रान्सची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी देखील आटोकाट प्रयत्न केले. त्याच्या आर्थिक नीतीचे

प्रमुख उद्दीष्ट फ्रान्समध्ये आर्थिक सुबत्ता व भरभराट प्रस्थापित करून ती टिकविणे हे होते. नेपोलियन कॉन्सुलेट असताना तर फ्रान्समधील औद्योगिकीकरणाची प्रक्रिया मोठ्या जोमाने सुरू होती. फ्रान्समध्ये बनविल्या जाणाऱ्या विविध वस्तूंच्या विक्रीसाठी ब्रिटिश वस्तूंमुळे ज्या स्पर्धेला सामोरे जावे लागत होते त्यापासून फ्रेंच वस्तूंना संरक्षण देण्याचे देखील नेपोलियनने प्रयत्न केले. यामागचा उद्देश असा होता की, फ्रेंच वस्तू मोठ्या प्रमाणात बाजारपेठांमध्ये विकल्या जाव्यात व त्याचा फायदा फ्रान्सच्या अर्थव्यवस्थेला व फ्रान्सची आर्थिक भरभराट होण्यासाठी व्हावा. त्याने फ्रान्समधील औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला उत्तेजन देण्यासाठी एका विशेष संस्थेची स्थापना केली. ह्या संस्थेला इंग्रजीत – 'Society for the Encouregement of National Industry' – 'सोसायटी फॉर द एनकरेजमेंट ऑफ नॅशनल इंडस्ट्री' असे म्हटले गेले. नेपोलियनने जनतेकडून अतिशय काळजीपूर्वकपणे कर वसुली करण्यास सुरुवात केली. तसेच भ्रष्ट अधिकाऱ्यांना दंड वा शिक्षा देण्याचे धोरण अवलंबिले. त्यामुळे निश्चितच शाही खजान्यातील उत्पन्न वाढण्यास मदत झाली. त्याचप्रमाणे नेपोलियनने फ्रान्सच्या शेअर बाजाराला देखील शिस्त लावली व त्याचे व्यवस्थितरित्या नियमन केले. आर्थिक बाबतीतला नेपोलियनचा सर्वात मोठा निर्णय वा कामगिरी म्हणजे त्याने फ्रान्समध्ये स्थापन केलेली 'बँक ऑफ फ्रान्स' (Bank of France) होय. ही फ्रान्सची अव्वल व एक प्रकारे राष्ट्रीय बँक ठरली. ही बँक व्यापाऱ्यांना पतपुरवठा करीत असे व तसेच ह्या बँकेमुळे फ्रान्समधील वाणिज्य व औद्योगिक प्रगतीला मोठ्या प्रमाणात हातभार लागला.

नेपोलियनच्या कारकिर्दीचे अजून एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याने फ्रान्समधील विविध शहरांना व प्रांतांना जोडणारे रस्ते निर्माण केले. तसेच जलमार्ग व कालव्यांचे संपूर्ण फ्रान्सभर जाळे तयार केले. त्याने अशाप्रकारची सार्वजनिक बांधकामे करण्याकरिता युद्ध कैद्यांना कामाला लावले. नेपोलियनने फ्रान्समध्ये बांधलेले महामार्ग म्हणजे त्याची मोठी व दीर्घकाळ टिकणारी कामगिरी होय असे इतिहासकार म्हणतात. १८११ सालापर्यंत नेपोलियनने फ्रान्समध्ये जवळ जवळ २२० मोठे रस्ते बांधले होते. ह्यापैकी तीस रस्ते तर फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे सुरू होऊन फ्रान्सच्या आंतरराष्ट्रीय सीमांवर वसलेल्या गावांपर्यंत जाते. याचा अर्थ, पॅरिस मधून कुठल्याही व्यक्तिला फ्रान्सच्या कुठल्याही भागात थेट आंतरराष्ट्रीय सीमेपर्यंत जाता येत असे. यामुळे प्रवाशांना तसेच वस्तुंच्या दळणवळणासाठी खूपच मदत झाल्याचे निदर्शनास येते. नेपोलियनच्या महामार्ग बांधणीच्या बाबतीतला उच्चांक म्हणजे त्याने आल्प्स्च्या पर्वतरांगा ओलांडून इटलीतील ट्युरीन (Turin), मिलान (Milan), रोम (Rome) व नेपल्स् (Naples) ह्या शहरांना फ्रान्सशी जोडणारे बांधलेले दोन महामार्ग होत. नेपोलियनने बांधलेल्या ह्या विविध रस्त्यांची वा महामार्गांची तुलना प्राचीन काळातील दक्षिण व मध्य आशियातून जाणाऱ्या रॉयल रोडशी (Royal Roads राजमार्ग) करावीशी वाटते. किंबहुना अशी तुलना करण्याचा मोह आवरता येत नाही. ह्या 'रॉयल रोड'ची वा राजमार्गाची दुरुस्ती व पुनर्बांधणी इसवीसन पूर्व ५ व्या शतकात तत्कालीन पर्शियन राजा डारियस द ग्रेट (Darius the Great) याने केली होती. हा डायरियस द ग्रेट हा सायरस द ग्रेट (Cyrus the Great) याने प्रस्थापित केलेल्या अॅचमेनिड साम्राज्याचा (Achaemenid Empire) चौथा सम्राट होता. सायरस द ग्रेटचा कालखंड इसवी सन पूर्व ६०० ते ५३० हा होता; तर डारीयस द ग्रेटचा कालखंड इसवी सनपूर्व ५५० ते ४८६ असा होता. अॅचमेनिड साम्राज्यालाच (पर्शियाचे पहिले साम्राज्य असे देखील म्हणतात व प्राचीन पर्शियाचे आताचे नाव इराण हे होय.) डारियस द ग्रेटच्या काळात पर्शियन अॅचमेनिड

शत्रूने केलेले कौतुक हीच आपली सर्वोत्तम कीर्ती होय.

साम्राज्य हे यशाच्या व क्षेत्रफळाच्या अत्युच्च शिखरावर होते असे म्हणतात. डारियस द ग्रेटच्या काळात पर्शियन ॲचमेनिड साम्राज्यात पश्चिम आशियाचा (अरेबिया) बराचसा भाग, इराणचा भाग, पूर्व युरोपातील बाल्कनचा प्रदेश, काळ्या समुद्राच्या आसपासचा भाग, मध्य आशियातील बराचसा प्रदेश, इजिप्तसह उत्तर व वायव्य आफ्रिकेतील बराचसा प्रदेश, पूर्व लिबिया, सुदान हे प्रदेश तसेच सिंधू खोऱ्यापर्यंतचा प्रदेश इत्यादी भूभागांचा समावेश होता. यावरून ह्या साम्राज्याची विशालता आपल्या लक्षात येते. तसेच प्राचीन काळात पश्चिम (युरोप), मध्य-पूर्व (अरेबिया-पर्शिया-इराण), अफगाणिस्तान, दक्षिण आशिया (भारत), अतिपूर्व (चीन) आदी व इतर काही देशांना व खंडांना खुष्कीच्या (जमिनीच्या भूमार्ग) मार्गाने व जलमार्गाने (समुद्रमार्ग) जोडणारे एक जाळे अस्तित्वात होते. या जाळ्याला 'द सिल्क रोडस्' (The Silk Roads) असे म्हटले गेले आहे. सिल्क म्हणजे रेशम व त्याकाळात रेशमाच्या कपड्याचा व्यापार पश्चिमेसोबत मोठ्या प्रमाणात चालत असे व हे कापड प्रामुख्याने चीनमध्ये बनविले जात असे. त्यामुळेच ह्या व्यापारी 'भू' व 'जल' मार्गांच्या जाळ्याला सिल्क रोड म्हटले गेले वा नाव देण्यात आले. चीनचे सध्याचे राष्ट्राध्यक्ष क्षी पिंग यांनी 'वन बेल्ट वन रोड (One Belt One Road) ह्या गोंडस नावाखाली पुन्हा एकदा ह्या प्राचीन सिल्क रोडचे पुनर्जीवन करून मोठ्या प्रमाणात महामार्ग व लोहमार्ग बांधण्याचा व चीनला फक्त शेजारील राष्ट्रांसोबतच नव्हे तर, मध्य आशिया व पश्चिम आशियासोबत जोडण्याचा चंग बांधला आहे. ह्याचाच भाग म्हणून चीन व इराणला जोडणारा लोहमार्गदेखील बांधण्यात आला आहे व चीनच्या मालवाहू रेल्वेगाड्या इराणपर्यंत (राजधानी तेहरान) धावत आहेत. असो. वाचकांनी सिल्क रोडविषयी अधिक माहिती मिळविण्यासाठी 'पिटर फ्रँकोपन (Peter Frankopan) लिखित इंग्रजीतील - द सिल्क रोडस् (The Silk Roads) हे पुस्तक वाचावे. पिटर फ्रँकोपन ऑक्सफोर्डच्या वोरसेस्टर (Worcester) महाविद्यालयातील इतिहासकार आहेत. असो. ह्यावरून एवढेच म्हणावेसे वाटते की, असे भव्य काम करणे नेपोलियनच जाणे! दलदलीच्या प्रदेशातील जमिनींतून पाणी काढून टाकून त्या जमिनीस शेतीयोग्य जमीन बनविण्याचा उपक्रम देखील नेपोलियनने हाती घेतला. महत्त्वाची बंदरे मोठी करून त्यांचे रक्षण करण्याकरिता तेथे सैन्य व आरमार तैनात करण्यात आले.

नेपोलियनने फर्स्ट कॉन्सुल या नात्याने फ्रेंच राजसत्ता व चर्च तसेच रोमचा पोप यांच्यातील परस्पर संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला व यातूनच पोप दुसरा पायस (Pius II) यांच्यासोबत नेपोलियनने एक करार केला. ह्या कराराला कॉन्करडाट (Concordat) असे म्हटले जाते. ह्या करारानुसार फ्रान्समधील चर्च बिशप्स (Bishops) ह्या चर्चच्या अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली आणण्यात आले. तसेच नेपोलियनने कॅथलिक ख्रिस्तिधर्म हा फ्रान्सचा अधिकृत धर्म होय हे मान्य करून रोमचा पोप बिशप्सना धर्म शपथ देईल. मात्र त्यांची नियुक्ती फ्रेंच राजसत्ता म्हणजेच नेपोलियन करेल अशा आशयाची सहमती नेपोलियन व पोपमध्ये झाली. तसेच बिशप्सचे वेतन वा मानधन फ्रान्सच्या तिजोरीतून दिले जाण्याची तरतूद करण्यात आली. यामुळे आता बिशप्सना नेपोलियन सोबत वा फ्रेंच राजसत्तेसोबत बांधील राहण्याची शपथ घेणे क्रमप्राप्त होते. नेपोलियनने पोपसोबत अशा रीतीने संबंध सुधारले. मात्र, महाद्वीपकल्पीय प्रणालीच्या धोरणावरून पोप व नेपोलियनमध्ये वितुष्ट आले. तेव्हा पोपने नेपोलियनला बहिष्कृत केले तर नेपोलियनने पोपला अटकेत टाकले.

नेपोलियनने फ्रान्समध्ये केलेले अजून एक महत्त्वाचे काम म्हणजे त्याने 'कोड नेपोलियन' (Code Napoleon) नामक फ्रान्समधील नागरी कायद्यांची बनवलेली कायदे

संहिता होय. ही कायदेसंहिता वा 'कोड नेपोलियन' १८०४ साली फ्रान्समध्ये अंमलात आली. असे म्हटले जाते की, कोड नेपोलियनमध्ये दोनशेहून अधिक कायदेविषयक कलमे होती. १७८९ च्या फ्रेंच क्रांतीनंतर प्रस्थापित झालेल्या समतेच्या तत्त्वावर आधारित हा 'कोड नेपोलियन' होता. कोड नेपोलियनने लोकांना धार्मिक सहिष्णुता प्रदान केली. नागरी विवाहांना कायदेशीर मान्यता देऊन लोकांना घटस्फोट घेण्याचा अधिकार देण्यात आला. खाजगी मालमत्तेच्या रक्षणाची लोकांना हमी देण्यात आली. लोकांचे आपापसांतील संबंध, समाजातील संबंध तसेच त्यांची राज्याबाबतची म्हणजेच देशाबाबतची कर्तव्येसुद्धा लोकांना स्पष्ट करण्यात आली. त्याचप्रमाणे जनतेला विविध अधिकार व स्वातंत्र्ये तर बहाल करण्यात आलीच परंतु त्यांना त्यांची कर्तव्ये देखील बजावण्यात आली. एवढेच नव्हे तर, कोड नेपोलियनने पालक व त्यांची मुले यांच्या कर्तव्यासंबंधी देखील मार्गदर्शन केलेले आढळते. यावरून नेपोलियनने 'कोड नेपोलियन' बनविताना किती सूक्ष्म बाबींचा विचार केला होता याची प्रचीती येते. नेपोलियनने 'कोड ऑफ सिव्हील प्रोसिजर' (Code of Civil Procedure), पिनल कोड (Penal Code) व कमर्शिअल कोड (Commercial Code) ह्या कायदेसंहिता देखील बनविण्याचे आदेश दिले होते. परंतु १८१० पर्यंत तरी ह्या कायदेसंहिता पूर्ण होऊ शकल्या नव्हत्या. कोणत्याही देशाची प्रशासकीय व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी त्या देशात उत्तम कायदे–प्रणाली असणे आवश्यक असते व नेपोलियनने फ्रान्समध्ये अशी कायदे प्रणाली अस्तित्वात आणून फ्रेंच जनतेसाठी मोठे काम केलेले आपल्या निदर्शनास येते. कोड नेपोलियनच्या माध्यमातून संपूर्ण फ्रान्समध्ये एकाच प्रकारचे कायदे अंमलात आणण्याचा प्रयत्न केला होता व हा प्रयत्न निश्चितच वाखाणण्यासारखा होता. १७८९ च्या क्रांतीपूर्वी फ्रान्समध्ये अतिशय बकाल कायदेव्यवस्था होती. उमराव वर्ग / सरंजामदारांचा वर्ग व चर्चचे अधिकारी यांनाच समाजात खऱ्या अर्थाने कायद्यांचे रक्षण प्राप्त होते व सामान्य जनतेला वाऱ्यावर सोडण्यात आले होते असे म्हणणे वावगे ठरू नये. बुरबाँ राजघराण्याच्या काळातील असमानतेच्या तत्त्वावरील निकृष्ट कायदेव्यवस्था नेपोलियनने संपुष्टात आणून समानतेच्या तत्त्वावर आधारित असलेला 'कोड नेपोलियन' आणला व सामान्य जनतेची खऱ्या अर्थाने सेवा केली. त्यामुळेच नेपोलियन कमालीचा लोकप्रिय झाला. आपल्या ह्या कार्याचे महत्त्व नेपोलियन जाणून होता म्हणूनच त्याने सेंट हेलेना बेटांवरील आपल्या शेवटच्या दिवसांत समर्पक उद्‌गार काढले होते. ह्या उद्‌गारांचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते – 'My glory is not my having won forty battles. What will never be effaced, what will endure for ever is my civil code.' ह्या इंग्रजी वाक्याचा ढोबळ मानाने मराठीत पुढीलप्रमाणे अनुवाद करता येईल – 'माझा खरा गौरव मी चाळीस लढाया जिंकल्या यात नव्हे, जी गोष्ट केव्हाही पुसून टाकता येणार नाही (नाहीशी होणार नाही) व जी गोष्ट नेहमीच टिकून राहील ती म्हणजे मी बनविलेली नागरी (कायदे) संहिता होय.'

नेपोलियनने फ्रान्समध्ये सर्वसमावेशक अशा शैक्षणिक सुधारणा व बदलदेखील घडवून आणले. प्राथमिक शाळा प्रिफेक्ट (Prefect) व Sub- Prefect (सब-प्रिफेक्ट) ह्या अधिकाऱ्यांच्या सामान्य (सर्वसाधारण) देखरेखीखाली राहतील व ह्या शाळांची काळजी ग्रामस्थांनी व जनसमूहांनी घ्यावी अशा सूचना नेपोलियनने दिल्या. सर्व महत्त्वाच्या शहरांमध्ये माध्यमिक शाळा उघडण्यात आल्या. शिक्षकांची नेमणूक शासनातर्फे करण्यात येऊ लागली. तांत्रिक, नागरी व सैनिकी शिक्षणासाठी विशेष शाळांची स्थापना करण्यात आली. त्याचप्रमाणे पॅरिसमध्ये पॅरिस विद्यापीठाची (University of Paris) स्थापना करण्यात आली. पॅरिसमध्ये शिक्षकांना

प्रशिक्षण देण्यासाठीची संस्थादेखील स्थापण्यात आली. सर्व शाळांमध्ये ख्रिस्ती धर्माच्या नैतिक तत्त्वांची व नेपोलियनशी एकनिष्ठ राहण्याची शिकवण देणे आवश्यक होते.

नेपोलियनने विविध क्षेत्रांतील कलागुणांची व कामगिरींची दखल घेऊन प्रशंसा करण्यासाठी लिजॉन ऑफ ऑनर (Legion of Honour) हा नागरी किताब देण्यास सुरुवात केली. या किताबाचा उल्लेख आपण लेखाच्या सुरुवातीस केलेलाच आहे. हा किताब विविध क्षेत्रात प्रामुख्याने सैनिकी, नागरी, कला व राजकारणाच्या क्षेत्रात बजाविलेल्या उत्तम कामगिरीबद्दल बहाल करण्यात येत असे. महत्त्वाची बाब म्हणजे आजतागायत फ्रान्समध्ये हा किताब देण्यात येतो व आजही हा फ्रान्सचा सर्वोच्च नागरी किताब मानला जातो. हा किताब उत्तम लष्करी कामगिरीसाठी देखील देण्याची प्रथा आहे. भारतीयांसाठी उल्लेखिण्यासारखी बाब म्हणजे भारतातील प्रसिद्ध इंग्रजी वृत्तपत्र 'द टाईम्स ऑफ इंडिया' (The Times of India) ह्या इंग्रजी वृत्तपत्राचे माजी संपादक दिवंगत दिलीप पाडगावकर यांना हा किताब २००२ साली प्रदान करण्यात आला होता.

नेपोलियनने फ्रेंच कलावंताना व लेखक-कवींना राजाश्रय देण्याचे धोरण अंगिकारले व पॅरिस ह्या शहरास उत्तरोत्तर सुंदर बनविण्यासाठी तो सतत प्रयत्नरत राहात असे. पॅरिस हे सर्वात कलात्मक शहर व युरोपचे प्रमुख राजकीय केंद्र बनावे अशी त्याची इच्छा होती.

नेपोलियनला अनेकदा व प्रामुख्याने १८०३ व १८०४ साली ठार करण्याचे कट त्याच्या विरोधकांनी रचलेले आढळतात. मात्र नेपोलियनने हे विरोधकांचे कट उधळून लावून २ डिसेंबर १८०४ रोजी स्वतःला सम्राट वा बादशहा म्हणून राज्याभिषेक करवून घेतल्याचे निदर्शनास येते व नेपोलियनने स्वतःला सम्राट म्हणून राज्याभिषेक करविण्यासाठी साक्षात रोमन कॅथलिक ख्रिश्चनांचे तत्कालीन पोप (धर्मगुरू) सातवा पायस याला पाचारण केले होते. पोप जेव्हा फ्रान्समध्ये अवतरला तेव्हा त्याचे जंगी स्वागत करण्यात आले. यावरून एक गोष्ट लक्षात येते की, नेपोलियन धर्माने एक सच्चा रोमन कॅथलिक होता व त्याला आपल्या धर्माचा रास्त अभिमान होता. म्हणूनच तर त्याने आपला राज्याभिषेक करविण्यासाठी आपल्या धर्मगुरुला म्हणजेच पोपला थेट रोमवरून बोलावून घेतले होते. असे असले तरी, नेपोलियन हा धर्मवेडा नव्हता. त्याची धर्माविषयीची मते जेवढी सच्ची होती तेवढीच लवचिकदेखील होती. तो आपल्या साम्राज्याचा विस्तार करत असताना व प्रजेवर राज्य करीत असताना आपला धर्म कधीही आड येऊ दिला नाही असे लक्षात येते. त्यामुळेच तो एकदा म्हणाला होता - 'उलट मी फ्रान्समध्ये कॅथोलिक आहे आणि इजिप्तमध्ये मी मुसलमान आहे.' (डॉ. शरद कोलारकर 'ज्ञात-अज्ञात नेपोलियन' पृष्ठ क्र.१३९). नेपोलयिनचे हे वाक्य बरेच काही सांगून जाते.

नेपोलियनचे असे म्हणणे होते की, चर्चकडे म्हणजेच धर्मसंस्था आणि धर्मगुरुंकडे 'शिक्षण हा विषय देऊ नये. 'उलट विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण देणे ही राज्याची जबाबदारी असून धर्मगुरुंची नव्हे' अशा आशयाचे त्याचे मत होते. चर्चकडे शिक्षणाची जबाबदारी दिल्यास मुलांवर अंधश्रद्धेचे संस्कार होतील असे त्याचे मत होते. त्यामुळेच त्याच्याकाळात शाळेत घंटा वाजविण्याऐवजी नगारे म्हणजेच पडघम वाजविले जात असत, की ज्यामुळे मुलांमध्ये वीरभावना व शौर्य निर्माण व्हावे ही त्यामागची भूमिका होती. यावरुन नेपोलियनच्या व्यक्तिमत्त्वाचा एक वेगळाच पैलू उलगडतो यात वाद नाही.

नेपोलियन फ्रेंच राज्यक्रांतीच्या (१७८९ च्या) तत्त्वांनी भारावून गेलेला होता असे म्हणणे वावगे ठरू नये. याचे कारण म्हणजे नेपोलियनने ज्या विविध युरोपियन

देशांवर म्हणजेच – जर्मनी, इटली, पोलंड, नेदरलँडस् (हॉलंड) येथे आक्रमण केले तेथे तेथे त्याने आधुनिक प्रशासकीय यंत्रणा/ व्यवस्था तर उभारलीच परंतु फ्रेंच राज्यक्रांतीला अभिप्रेत असलेले सामाजिक समानतेचे तत्त्व प्रस्थापित करून तेथे खऱ्या अर्थाने सामान्य जनतेला न्याय देऊन सामाजिक समानता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. त्याने वर नमूद केलेल्या देशांमध्ये व जेथे कोठे आक्रमण केले तेथे सरंजामशाही नष्ट करून, सामाजिक समता प्रस्थापित करून तेथील आर्थिक प्रगती घडवून आणण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले व तेथील सामान्य माणसाचा वा जनतेचा कैवार करण्याचे प्रयत्न केले.

नेपोलियनने इटली व जर्मनीवर हल्ले करून व तेथे आपली सत्ता प्रस्थापित करून ह्या दोन देशांच्या एकिकरणाचा मार्ग मोकळा करून दिला असे म्हणणे वावगे ठरू नये. नेपोलियनने जेथे कोठे आक्रमण केले तेथे कळत नकळतपणे तेथील जनतेमध्ये राष्ट्रीय भावना निर्माण करण्याचे काम केले वा ते आपसूकच घडून आले. त्याने इटली व जर्मनीवर आक्रमण करून तेथून ऑस्ट्रीयाचा प्रभाव कमी केला व त्यामुळे येथील जनतेला पुढे जाऊन आपापल्या देशांचे एकीकरण करणे सुकर झाले असे म्हणणे म्हणजे अतिशयोक्ती होणार नाही. त्याने इटली व जर्मनीमध्ये सर्वत्र सारख्याच स्वरूपाची प्रशासकीय यंत्रणा व एक समान कायदेप्रणाली बनविली. त्यामुळे ह्या लोकांमध्ये राष्ट्र प्रेमाची भावना व ऐक्य निर्माण होण्यास मदतच झाली. त्यामुळेच नेपोलियनला फ्रेंच राज्यक्रांतीचे अपत्य व क्रांतीपूर्व जुना युरोप व क्रांती नंतरचा नव्याने निर्माण होणारा नव युरोप यांच्यातील दुवा मानले जाते.

वरील विवेचन वाचल्यावर नेपोलियन किती महान सम्राट व कुशल प्रशासक होता याची प्रचीती येते. परंतु ह्या महान सम्राटाचा १८१५ च्या वॉटरलूच्या लढाईत दारुण पराभव झाला व सेंट हेलेनाच्या ओसाड बेटावर करुण अंत झाला. शेवटी, नेपोलियननामक झंझावात अवघ्या १४ ते १५ वर्षांत संपुष्टात का यावे असा विचार केल्यास त्याची कारणे पुढीलप्रमाणे द्यावी लागतील. नेपोलियन हा अतिमहत्त्वाकांक्षी व्यक्ती होता. त्याला संपूर्ण युरोपवर आपले प्रभूत्व असावे असे वाटत होते व त्यामुळे त्याने अनेक देशांवर हल्ले केले व त्यातून अनेक शत्रूदेखील निर्माण केले व शेवटी ह्या शत्रूंनी एकत्र येऊन, आघाड्या करून त्याचा अंत केला. नेपोलियनने केलेली अजून एक महत्त्वाची चूक म्हणजे त्याने इंग्लंडसारख्या प्रबळ राष्ट्राशी, की ज्याकडे सामर्थ्यशाली आरमार होते. घेतलेले वैर व महाद्वीपकल्पीय प्रणालीचा केलेला अट्टाहास हे होय. इंग्लंडने स्पेन, जर्मनी, रशिया, ऑस्ट्रीया आदी राष्ट्रांना शिस्तशीरपणे एकत्र आणून फ्रान्सविरुद्ध आघाड्या उघडल्या व ही बाब नेपोलियनच्या दृष्टीने हानीकारक ठरली.

नेपोलियनला वॉटर्रलुच्या लढाईतील पराभवानंतर ब्रिटिशांनी बंदी बनविले व दक्षिण अटलांटिक महासागरातील सेंट हेलेना या बेटावर नजरकैदेत ठेवले. ब्रिटिशांनी नेपोलियनला त्याच्यासोबत नोकरचाकर नेण्याची अनूमती देखील दिली होती. तसेच त्याला त्याच्या गरजेनुसार भव्य व मोठे असे निवासस्थान असेल याची देखील व्यवस्था केली होती. यावरून ब्रिटिशांविषयी एक निरीक्षण नोंदवणे अतिशयोक्ती ठरणार नाही व हे निरीक्षण म्हणजे जरी ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्य विस्तारासाठी व इंग्लंडच्या बचावासाठी इतिहासात अनेक लढाया व युद्धे केलेली असली तरी त्यांनी त्यांच्या आश्रयाला येणाऱ्या शत्रूला व पराभूतांना चांगली वागणूक देऊन त्यांना सन्मानाने राजाश्रय दिलेला आढळतो. उदाहरणच द्यायचे झाले तर भारतातदेखील साम्राज्यविस्तार करत असताना एकोणिसाव्या शतकात जेव्हा ब्रिटिशांनी तैनाती फौज, दत्तक खालसा धोरण, युद्धे, लढाया इत्यादी मार्गांनी भारतीय राजांना व

एवढे लहान बना की प्रत्येक जण तुमच्यासोबत बसू शकेल आणि इतके मोठे बना की जेव्हा तुम्ही उभे राहाल तेव्हा कोणीही बसलेला नसेल.

संस्थानिकांना पराभूत केले. परंतु शरण आलेल्यांना व त्यांच्याशी तह केलेल्या राजांना वा राजकिय कुटूंबातील व्यक्तींना ब्रिटीशांनी तनखे दिलेले व त्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेचे व इतर सुखसोई तसेच सुविधांचे प्रयोजन केलेले आढळते. त्यामुळे नेपोलियनला स्वयंपाक घर, भोजनगृह, शय्यागृह, क्रिडागृह, स्नानगृह, अभ्यासिका, स्वागतिका, बागबगिचे इत्यादी सुविधा असणाऱ्या निवासस्थानाची व्यवस्था सेंट हेलेना येथे ब्रिटिशांनी केलेली होती. मात्र, त्याच्या हालचालींवर ब्रिटिशांची व प्रामुख्याने सेंट हेलेनाचा ब्रिटिश गव्हर्नर सर हडसन लो याची करडी नजर होती यात वाद नाही. सर हडसन लो याच्याविषयी नेपोलियनची मते काही चांगली नव्हती. सर हडसनलोच्या सेंट हेलेनातील आगमनापासूनच नेपोलियन त्याच्याविषयी कुरबूर करत असे.

सेंट हेलेनामध्ये असताना सुरुवातीस नेपोलियनला वर्षभरासाठी ऐंशीहजार (८०,०००) पौंड एवढी तनखा मिळत असे व त्याच्यासोबत एकावन्न (५१) लोक राहत असत. त्यामुळे ही तनखा त्याला कमी पडत असे अशी चर्चा सतत असे. त्यामुळे काही काळाने ब्रिटिशांनी नेपोलियनची तनखा सालिना एक लाख वीस हजार (१,२०,०००) पौंडांवर नेली असे आढळते. सेंट हेलेनात त्याला भेटलेल्या व्यक्तींकडून आपणास नेपोलियनविषयी व त्याच्या व्यक्तिमत्त्वाविषयी, तसेच त्याच्या खाजगी जीवनाविषयी विविध प्रकारची माहिती मिळते. उदाहरणच द्यायचे झाले तर असे म्हटले जाते की, जरी ब्रिटिशांनी त्याला अतिशय उंची व महागडे मद्य उपलब्ध करून दिले होते, तरीही तो अतिशय कमी प्रमाणात मद्य प्राशन करत असे. त्याला घोड्यावरून रपेट मारणे पसंत असे. तसेच तो रात्रीचे भोजन साधारणतः रात्री आठ वाजता घेत असे व जेवणानंतर त्याला कॉफी हे पेय घेणे आवडत असे. त्याचप्रमाणे त्याला स्नान करणे देखील खूप आवडत असे.

ह्या अतिशय उमद्या, तरुण व पराक्रमी सम्राटाचा अंत अंथरुणाला खिळून झाला ह्याचे वाईट वाटते. नेपोलियनच्या अंत्यसमयीचे वर्णन डॉ. शरद कोलारकरांनी त्यांच्या 'ज्ञात-अज्ञात नेपोलियन' या ग्रंथात पृष्ठ क्र. ३७३-३७४ वर केले आहे. हे वर्णन वाचून आपल्या मनास चटके बसतात व फार वाईट वाटते. डॉ. कोलारकरांनी ह्या जगप्रसिद्ध सम्राटाच्या शेवटच्या क्षणांचे केलेले वर्णन वाचकांसाठी खाली उद्धृत करत आहोत -

''धर्मगुरूंना सूचना देताना रोमन कॅथालिक धर्माप्रमाणे माझ्यावर शेवटचे संस्कार केले जावेत अशी इच्छा त्याने व्यक्त केली. त्या सूचनांत त्याने लिहिले, ''मी नास्तिक नाही किंवा नुसता बुद्धिवादी (Rationalist) नाही. परमेश्वरावर माझी श्रद्धा आहे आणि माझ्या वडिलांचा जो धर्म तोच माझा धर्म आहे. मी कॅथालिक म्हणूनच जन्माला आलो व अखेरीपावेतो माझा तोच धर्म होता.''

त्याचे इंग्लंडविषयीचे वैर शेवटपर्यंत कायम होते. इंग्लिश डॉक्टरांची सावली यापूर्वी त्याला वर्ज्य होती. डॉ. अरनॉट फक्त अपवाद होता. ''माझ्या देहाला किंवा शवाला इंग्रज डॉक्टरचा स्पर्शदेखील होऊ देऊ नका. इंग्लंडच्या सूडबुद्धीमुळे आणि हडसन लो च्या जाचामुळे माझा मृत्यू लवकर ओढावला आहे.'' असा आक्रोश शेवटच्या दिवसात सारखा चालू होता.

औषध-उपायांची मात्रा चालेना. पोटात काही राहिना. नेपोलियनला सतत उलट्या होत. त्यामुळे नेपोलियन गलितगात्र झाला. ३ मे रोजी बादशहाचा शेवट जवळ आलेला आहे असे स्पष्ट दिसू लागले. त्याला मधून मधून वाताचे झाटके येत. त्याचे साहाय्यक वारंवार डॉक्टरांना बोलावून आणीत. पण त्याचा काही उपयोग नव्हता. वातातच तो काहीनाकाही बडबड करी. त्याच्या डोळ्यांसमोर त्याच्याच जीवनातले काही प्रसंग उभे रहात असावेत असे

त्याच्या बडबडीवरून दिसत होते. त्याचा जीव घोटाळत होता तो फक्त पुत्राच्या आठवणीने. त्या सहा वर्षाच्या मुलाच्या आठवणीने तो व्याकूळ होत होता.

एप्रिलचा शेवटचा आठवडा उगवला व नेपोलियन अंथरुणाला पुरा खिळला. बादशहाची गंभीर स्थिती पाहून फ्रेंच परिवारातील सारेजण आळीपाळीने त्याच्या पलंगाभोवती बसू लागले. बेटातील नागरिकांची रीघ लागू लागली. एके दिवशी सायंकाळी बादशहाचा एक आजारी नोकर कुणाच्या तरी आधाराने आत आला व बादशहाच्या पायाशी लोळण घेत करूणा भाकू लागला. ''परमेश्वरा, माझा जीव घे, पण बादशहाला वाचव. माझं उरलंसुरलं आयुष्य बादशहाला दे.'' या उत्कट प्रार्थनेने भोवतालचे सारे वातावरण शोकमग्न झाले व सर्वांच्या डोळ्यांतून अश्रू पाझरू लागले. २ मे रोजी बादशहाला बोलणे कठीण झाले. तो खुणेनेच हवे नको सांगे. मध्येच तो काहीतरी पुटपुटे तर कधी ''पाणी पाणी'' असे क्षीणपणे ओरडे. डॉ. अंतोमार्ची उशाशी सदैव बसून होता आदल्या दिवशी जड आवाजात बादशहाने त्याला बजावले होते, ''प्रिय डॉक्टर, माझा चांदीचा दिवा आईला देण्यास विसरू नका.'' डॉक्टरने जड आवाजात त्याला 'हो' म्हणाले. ३ तारखेला सायंकाळी मर्चंडने बादशहाच्या तोंडचा शेवटचा हुकूम ऐकला. तो म्हणाला, ''मर्चंड, अरे ती खिडकी आता सताड उघड. प्रभूने निर्मिलेली प्रसन्न हवा येऊ दे माझ्या अंगावर.''

४ मे च्या रात्रीपासूनच नेपोलियनची शुद्ध हरपू लागली. नेत्र पैलतीराला लागले. मध्यरात्री बेटावर अचानक वादळ उठले व जोरदार पाऊस सुरू झाला. सकाळी पहातात तो बादशहाने लावलेली सारी झाडेझुडपे उन्मळून पडली होती. ५ मे रोजी बादशहा कोणत्याही प्रकारची हालचाल न करता गुंगीत पडून होता. कोणीतरी मध्येच चमच्याने तोंडात पाणी घातले तर ते तसेच बाहेर पडले. बादशहा काही तासांचा सोबती आहे या कल्पनेने सारेजण गंभीर मुद्रेने, चिंताग्रस्त बसून होते. या दिवशी पहाटे मंथोलन उशाशी बसून होता. त्याने बादशहाचे शेवटचे शब्द ऐकले ते असे होते – "France, Armee, Tated' armee, Josephine–" यांनतर नेपोलियनची वाणी कायमची बंद पडली. यानंतर संध्याकाळपर्यंत नेपोलियन तसाच पडून होता. बरोबर पाच वाजून एकोणपन्नास मिनिटांनी त्याचे प्राणोत्क्रमण झाले. प्राण गेला तेव्हा डोळे उघडे राहिले होते. ते मंथोलनने हळूच मिटले. (५ मे १८२१)

अशारितीने नेपोलियनचे युग जणू संपुष्टात आले. नेपोलियनच्या मृत्यूची वार्ता गव्हर्नर हडसन लो ला कळविण्यात आली. तेव्हा तो उद्गारला, ''इंग्लंडचा सर्वात बलिष्ठ शत्रू गेला. परमेश्वर त्याला क्षमा करो!'' दुसरे दिवशी सकाळी ६ वाजता सर हडसन लो आपल्या काही सहकाऱ्यांसह नेपोलियन खरोखरीच मृत्यू पावला किंवा काय याची खात्री करून घेण्याकरिता नेपोलियनच्या निवासस्थानी आला.

दुसरे दिवशी डॉ. अंतोमार्ची याने पाच ब्रिटिश सर्जनांच्या मदतीने नेपोलियनचे शवविच्छेदन केले. पोटाची शस्त्रक्रिया व तपासणी दोन-तीन तास चालू होती. नेपोलियनचे लिव्हर अतिशय बिघडलेले आढळले. अल्सरचे रूपांतर शेवटी कॅन्सरमध्ये झाल्याचे डॉक्टरांना आढळून आले.''

अशातऱ्हेने अठराव्या व एकोणिसाव्या शतकातील नेपोलियन नामक झंझावाताचा अंत ८ मे १८२१ रोजी वयाच्या अवघ्या बावन्नाव्या वर्षी झाला. सुरुवातीला नेपोलियनचे शव सेंट हेलेना या बेटावरच दफन करण्यात आले व त्याच्यासोबत राहणारी त्याची नोकरचाकर मंडळी युरोपला परतली. परंतु याला अपवाद म्हणजे नेपोलियनचा सच्चा सेवक व अनुयायी सार्जंट ह्युबर्ट हा

होता. असे म्हटले जाते की, हा सार्जंट ह्युबर्ट जोपर्यंत नेपोलियनचे शव सेंट हेलेनामधून फ्रान्समध्ये परत नेण्यात आले नाही, म्हणजेच तब्बल एकोणीस वर्ष (१८४०), तोपर्यंत हा नेपोलियनचा ईमानी शिपाई दररोज आपल्या मालकाच्या म्हणजेच सम्राटाच्या कबरीशेजारी जाऊन बसत असे. हे वाचून अंगावर रोमांच उठल्यावाचून राहणार नाही.

श्री. म. श्री. दीक्षित यांनी नेपोलियनचे जे चरित्र लिहिले आहे (प्रकाशन दिनांक – १५ ऑगस्ट, १९८४) त्यात त्यांनी पहिल्याच पृष्ठावर सार्जंट ह्युबर्ट यास खालील मजकूर लिहून ह्या चरित्राची अर्पणपत्रिका सादर केली आहे. –

''सार्जंट ह्युबर्ट यास –

नेपोलियनच्या पश्चात् हा हठयोगी फ्रेंच माणूस धन्याच्या थडग्यापाशी एकोणीस वर्षे पहारा करीत उभा होता!''

जोसेफाईनचा २९ मे १८१४ रोजी मृत्यू झाला आणि तिचा व नेपोलियनचा १८१० साली जरी घटस्फोट झालेला असला तरी तिला नेपोलियनविषयी सहानुभूती होती व नेपोलियनच्या मृत्युसमयी देखील त्याच्या मुखातून बाहेर पडलेला शेवटचा शब्द 'जोसेफाईन' (Josephine) हाच होता. याला नियतीच म्हणावे दुसरे काय. त्याने पहिल्यांदा अतोनात प्रेमात पडून लग्न केलेल्या पहिल्या बायकोचेच नाव अंत्यसमयी त्याच्या तोंडातून बाहेर पडले.

नेपोलियनने जे विशाल साम्राज्य निर्माण केले होते. त्यात मोठ्या प्रमाणात विविधता व विषमता होती व अशाप्रकारच्या साम्राज्याला टिकवून ठेवणे कठीण असते. त्यातूनच इंग्लंडसारखे देश ऑस्ट्रीया व इतर देशांना नेपोलियन विरुद्ध खतपाणी घालण्याचे काम करतच होते. नेपोलियन जर इंग्लंडचा पराभव करू शकला असता तर कदाचित त्याचा एवढ्या लवकर पाडाव होऊ शकला नसता. परंतु इंग्लंडचा पराभव करण्यासाठी नेपोलियनकडे सामर्थ्यशाली आरमार असणे आवश्यक होते व तसे आरमार नेपोलियनकडे नव्हते. त्याचप्रमाणे नेपोलियनने महाद्वीपकल्पीय प्रणालीचा धरलेला अट्टाहासदेखील त्याच्या दृष्टीने घातक ठरला. त्यातूनच नेपोलियनने रोमच्या पोपविरुद्ध कारवाई करून कॅथलीक ख्रिश्चन लोकांचादेखील रोष ओढवून घेतला. तसेच त्याला 'स्पॅनिश अलसर'ची चूकदेखील महागात पडली. नेपोलियनने केलेली अजून एक मोठी चूक म्हणजे त्याने रशियावर केलेले आक्रमण होय. ह्या आक्रमणादरम्यान नेपोलियनने जवळ जवळ पाच लाख सैन्य तर गमावलेच परंतु ह्या स्वारीनंतर त्याची पुरती इभ्रत गेली व युरोपमधील दबदबा कमी होण्यास देखील ही मोहीम कारणीभूत ठरली. त्यामुळेच इंग्लंडच्या नेतृत्वाखाली युरोपियन देशांनी पुन्हा एकदा आघाडी उघडली व नेपोलियनचे 'वॉटरलू' घडवून आणले. मात्र, नेपोलियन हा जगाच्या इतिहासातील एक महान योद्धा-सेनापती, कुशल प्रशासक व श्रेष्ठ राजा होता यात दुमत नाही. अशा ह्या शूरवीर, जनताभिमुख व नरश्रेष्ठ राजाला मानाचा मुजरा!

**संदर्भ :**


वर्ल्ड सिव्हिलायझेशन्स् – खंड–२ : फिलीप ली राल्फ

देयर हिस्ट्री ॲड देयर कल्चर व इतर

वर्ल्ड हिस्ट्री : बी. व्ही. राव

युरोप सिन्स नेपोलियन : डेव्हीड थॉम्पसन

फ्रेंच राज्यक्रांती : ज. द. जोगळेकर

फ्रेंच राज्यक्रांती : न. चिं. केळकर

रेव्होलूशनरी युरोप : जॉर्ज रुड

ज्ञात अज्ञात नेपोलियन : डॉ. शरद कोलारकर

नेपोलियन (चरित्र) : म. श्री. दिक्षित



**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**

उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख

जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६

Email :subhashinscotland@gmail.com


आयुष्यात कोणत्याच मर्यादा नाहीत; फक्त तेवढ्याच आहेत ज्या तुम्ही तुमच्या मनात निर्माण केल्या आहेत.

# स्वरांजली : पुष्प ४ थे : 'ऋतू' हिरवा...

*बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने 'स्वरांजली' या कार्यक्रमाचे चौथे पुष्प 'ऋतू हिरवा'चे आयोजन केले होते. या वेळी सादर केलेल्या निवेदनातून 'ऋतू हिरवा' चा उद्देश या लेखात विशद केला आहे – संपादक*

सुस्वागतम्! सुस्वागतम्
नमस्कार रसिक हो,

ज्ञानद्विपावरील या 'थोरले बाजीराव पेशवे' सभागृहात आजच्या या सूरसंध्येत आपले सहर्ष स्वागत ! उद्यमशीलकृतीशील व प्रयोगशील अशा 'विद्या प्रसारक मंडळ' या कुटुंबाचा आपण सर्वचजण एक भाग आहोत.

मंडळी, कुटुंबात आपल्या प्रियजनांसमवेत व्यतीत केलेले क्षण... गप्पांत, मजेत, गाण्यांच्या मैफीलीत फुलविलेले आनंदमळे हा आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यातला आठवर्णीमधला 'मर्मबंधा'चा ठेवाच असतो. नाही का?'

असेच काही विरंगुळ्याचे, जिव्हाळ्याचे क्षण समस्त आर्त मनांवर हळुवार फुंकर घालत प्रेमाचा वर्षाव करून जावेत म्हणून आजच्या या कार्यक्रमाचे प्रयोजन !

विप्रमंचे बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय आपले सहर्ष सादर करीत आहे... स्वरांजली पुष्प चौथे... 'ऋतू हिरवा' !!!

चिबं होऊ या पावसाच्या कवितेत. भिजून जाऊ या कवितेच्या पावसात!

कार्यक्रमाला सुरुवात करण्यापूर्वी उपस्थित सर्वांना आग्रहाची नम्र विनंती की, आपल्या शरीराच्या नवउत्क्रांतीत अविभाज्य अंगाला अर्थात भ्रमणध्वनी अर्थात सोप्या मराठीत 'मोबाईल'ला जाणीवपूर्वक विश्रांती द्यावी अथवा त्यास शांत करावे. मित्रांनो, त्यातुन उमटणाऱ्या यांत्रिक ध्वनीलहरींपेक्षा आजच्या कलाकारांच्या स्वरलहरी आपल्याला जास्त आनंद देतील याची खात्री बाळगा! धन्यवाद!

मंडळी, आपल्या भारतीय संस्कृतीत प्रकाशाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'प्रकाश' हे प्रतीक आहे ऊर्जेचे, चैतन्याचे, ज्ञानाचे, सुखाचे आणि आनंदाचे! या सूरसंध्येची तेजोमय सुरुवात करण्यासाठी मी विनंती करते माननीय डॉ. बेडेकर सर, विविध संस्थांचे प्राचार्य यांना दीप प्रज्वलनासाठी प्रार्थना करते. त्या ईश्वरचरणी... विश्वातील सकल जीवांसाठी. 'येणारा भविष्यकाळ' हा मंगलमय, आनंदमय, तेजोमय रहावा.

धन्यवाद. मी मान्यवरांना विनंती करते त्यांनी आसनस्थ व्हावे. मी विनंती करते प्राचार्या माननीय डॉ. सौ. पेजावर मॅडमना. त्यांनी स्वागतपर दोन शब्द बोलावेत... धन्यवाद मॅडम.

आता सुरुवात करू या या संगीत मैफलीला; त्या ज्ञानमूर्ती चौदा विद्या, चौसष्ट कलांच्या अधिष्ठात्या श्री गणेशाला स्मरून! सादर करतोय गणेश वंदना.

रसिकहो! आजच्या आपल्या कार्यक्रमाचं नाव आहे 'ऋतू हिरवा...' अर्थात मूळ सूत्र...पाऊस! पाऊस हं...

हसणारा पाऊस...हसवणाराही पाऊस
नाचणारा पाऊस...नाचवणाराही पाऊस
प्रेमळ पाऊस....प्रेमही पाऊस
प्रेमासाठीही पाऊस...प्रेमामध्येही पाऊस!

---

काही माणसे पंचविसाव्या वर्षीच मरून जातात पण त्यांचं दफन मात्र पंचाहत्तराव्या वर्षी केले जाते.

आशेचाही पाऊस...नि अपेक्षांचाही पाऊस!

एकूणच काय समस्त इहलोकी आस असते ती त्या वरुणराजाच्या आगमनाची –

ग्रीष्माच्या गर्दीत...
उन्हाची काहिली
कातावली मने
शोधती सावली!
कोरडे ठाण
नदीचे पात्र
सुखाच्या शोधात
आर्त गात्र!
श्रमांचे डोंगर अन्
घामाचे पाट
दाटलेले डोळे
बघती 'पावसाची वाट' ...

(सौजन्य : कल्पिता मुळये)

आणि मग...मग दिसू लागतात दुरवरून येणारे कृष्णमेघ...एक...दोन...तीन...आणि मग रांगच लागते त्यांची! मग हळूहळू होते त्यांची दाटी...आणि मग, मग होतं...काहीसं हे असं!

मंडळी, आठवतंय का? कधी झाली हो आपली पहिली ओखळ या पावसाशी? नाहीना सांगता येणार... कदाचित तेव्हा जेव्हा कळतही नव्हतं. मग झाली तरी कशी गट्टी म्हणायची याच्याशी?

एका मुलीने भिजता भिजता आकाशात बघून विचारलं 'आई, पाऊस कसा पडतो?'

बालसंस्कारांची पुस्तके कोळून प्यायलेली आई; त्यात विज्ञान निष्ठ! 'अग समुद्रात पाणी असतं ना त्याची वाफ होते आणि त्या...'

'अग पण वाफ म्हणजे काय?'

'मी नाही का चहा करताना पाणी उकळल्यावर ती वर वर जाते...'

'पण समुद्रात कोण उकळतं पाणी?'

'अग सूर्यबाप्पा करतो ते आणि मग बनतात ढग...'

'मग आपल्या घरात का नाही बनत ढग? रोज का नाही पडत पाऊस? रात्री सूर्यबाप्पा नसताना तेव्हा कोण पाडतं पाऊस?' झालं...पडला पाऊस आईच्या 'शिकवणी'वर...परंतु परंतु कळलं तिथपर्यंत आईला...

जगण्याचा आनंद घ्यायचंही एक शास्त्रच आहे...आणि जे आपणास ते शिकवतात ते शास्त्रज्ञ नव्हे ते तर कलाकार!

आता घेऊन येत आहोत झलक अशा अमर कलाकृतींची...ज्यांनी नकळत्या वयातच आपल्या सगळ्यांना पाऊस फक्त समजावलाच नाही तर त्याच्याशी आपलं अतुट मैत्रिच नातंच जुळवून दिलं !

पाऊस म्हटलं की संगीत प्रेमींना, संगीतदर्दिंना आठवतो 'राग मल्हार', ज्याच्या सुरात अशी काही विलक्षण ताकद आहे, अशी काही जादू आहे की, तो वरुणराजही हात जोडत नतमस्तक होऊन येतो सेवेत रुजू व्हायला...

ऐकू या. महाराष्ट्राचे दैवत ग. दि. मांची मल्हार रागातील अप्रतिम काव्यरचना जिला लाभला प्रतिभाशाली मन्नाडे सारख्या गायकाचा स्वर आणि वसंत पवारांचे अजरामर संगीत...घेऊ या आनंद या ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून...

पाऊस, त्यातून निर्माण होणाऱ्या आनंदलहरी, आणि त्यांची 'अभिव्यक्ती' ही कालातीत आहे. घेऊन येतोय दोन भिन्न काळातील दोन भिन्न कलाकृती दोन

---

कोकिळा स्वतःची भाषा बोलते म्हणून ती मुक्त आहे. परंतु पोपट दुसऱ्याची भाषा बोलतो म्हणून तो पिंजऱ्यात गुलाम बनून राहतो. म्हणून स्वतःची भाषा, स्वतःचे विचार आणि स्वतःवर विश्वास ठेवा.

भिन्न अभिव्यक्ती, पण आत्मा एकच. पाऊस आणि त्यातला मनमुराद आनंद! लुटू या मजा या आनंदाची AV च्या रूपांत.

मंडळी...पावसाची खरी मजा येते का हो शहरात? शहरात राहूनही भिजत भिजत आपलं मन जातं नखशिखांत सुंदर अशा ऊबदार गावात...

ओला चिंब आसमंत, लाल कौलांवरून ओघळणाऱ्या पागोळ्या, खिडकीच्या गजांना... पानांच्या कडांवर बिलगून बसलेले पावसाचे थेंब. दगडांवर भिंतीवर चकाकती मऊशार हिरवी शेवाळदुलई. मातीला फुटू लागलेले आशेचे अंकुर आणि आसमंतात भरून राहिलेला मनाला सुखवणारा... मातीचा सुगंध... जो आजकाल शहरांमधून जवळजवळ हद्दपार केलाय आपण ! जाणीवच नाहीये आपल्याला...कशा कशाला मुकतोय आपण या काळाच्या ओघात आणि ऐहिक सुखाच्या रेट्यात...

ऐकू या संवेदनशील मनाकडून...काय जादू केलेय या पावसाने त्यावर...कवी ना. धों. महानोरांची अप्रतिम कविता, सुरसम्राज्ञी आशा भोसले यांचा स्वर्गीय स्वर आणि विलक्षण संगीत हृदयनाथ मंगेशकरांचे...

आता ऐकू या...लोकप्रिय कवी सौमित्र यांची काव्यरचना. अशोक पत्कींचे संगीत आणि मनाची सरगम सहज छेडणारे स्वर...साधना सरगमजींचे...एक चित्रपटगीत...

कार्यक्रमाच्या मध्याकडे वाटचाल करताना आता आम्ही जी रचना आपल्यासाठी सादर करतोय ती म्हणजे अजरामर त्रयींचा अलौकिक आविष्कार. शांताबाई, श्रीधर फडके आणि आशाताई... म्हणताच क्षणी आनंदात अनेक माना डोलल्या... अगदी बरोबर. सादर आहे शीर्षकगीत...ऋतू हिरवा...

मंडळी, हिंदी सिनेसृष्टीतील गुलजार पंचम यांसारख्या किंवा त्यातुनही काकणभर सरस गीत. संगीतकारांच्या जोड्या मराठी संगीतसृष्टीलाही लाभल्या, जसे गदिमा–बाबूजी. अशोक जी. परांजपे. अशोक पत्की ते अगदी अलीकडच्या काळातले गुरू ठाकूर–अजय अतुल अशीच एक सध्याची लोकप्रिय गीत–संगीतकार द्वयी...म्हणजे संदीप–सलील!

या द्वयींनी अशी काही कमाल केली की, कॉलेजमध्ये Jazz, Pop आणि Rap वरच थिरकणारी तरुणाई चक्क...मराठी गाणी आळवू लागली...आणि पुन्हा एकदा वरणभात साजुक तुपाने मात केली पिझ्झा पास्त्यावर.

कल्पनेतील 'अवकाश' प्रत्यक्षात उभी करणारी विलक्षण शब्दसंपदा. अल्वारपणे मनाला भिडणारी काव्यरचना म्हणजे गीतकार संदीप खरे आणि काव्यातील भावना अचुक हेरून अधिक प्रभावीपणे पोचवणारे विद्वान संगीतकार सलील कुलकर्णी. ऐकू या या द्वयीच्या दोन रचना...दोन्ही पावसाशी निगडित पण तरीही निराळ्या धाटणीच्या!

पावसाने जनसामान्यांची ही अवस्था!... तर संवेदनशील कविमने...अहो ती तर काय विचारता... या पावसाचे वर्णन करताना त्यांची लेखणीही जणू हिरवी होते.

पाडगावकर म्हणतात...
पाऊस आला रे आला, धारा झेला रे झेला
झाडे झाली हिरवी गाणी...रूणझुण पैंजण पानोपानी
सुगंध ओला रे ओला...पाऊस आला रे आला (कवी – मंगेश पाडगावकर)

बहुतांश मने पावसाने बहरत असली तरी असतातच त्रासलेले काही जीव...आजूबाजूला...किंवा कधी ते आपल्यातच असतात. मग होते एकदा जुगलबंदी प्रेमळ लाडकी –

---

जगणे निरर्थक म्हणतो तो बेइमान आहे, सुखासाठी कधी हसावं लागतं, तर कधी रडावं लागतं.
कारण सुंदर धबधबा बनायला पाण्यालाही उंचावरून पडावं लागतं.

त्याला पाऊस आवडत नाही, तिला पाऊस आवडतो
ढग दाटून आल्यावर तो तिच्या तावडीत सापडतो!
मी तुला आवडते, पण पाऊस आवडत नाही
असलं तुझं गणित खरंच मला कळत नाही!
पाऊस म्हणजे चिखलसारा, पाऊस म्हणजे मरगळ
पाऊस म्हणजे गार वारा, पाऊस म्हणजे हिरवळ
पाऊस कपडे खराब करतो, पाऊस वैतागवाडी
पाऊस म्हणजे भिजरी पायवाट, पाऊस म्हणजे झाडी
पाऊस रेंगाळलेली कामं, पाऊस म्हणजे सुट्टी उगाच
पावसामध्ये गुपचूप निसटून मन जाऊन बसतं ढगात
दरवर्षी पाऊस येतो, दरवर्षी असं होतं
पावसावरून भांडण होऊन लोकांमधे हसं होतं
पाऊस आवडत नसला तरी ती त्याला आवडते
पावसासकट आवडावी ती म्हणून ती ही झगडते
रुसुन मग ती निघून जाते, भिजत राहाते पावसात
तिचं त्याच भांडण असं ओल्या चिंब दिवसात

(कवी सौमित्र)

मंडळी ऐकू या पावसानेच जवळ आणलेल्या अशा युगुलाचे एक गीत -

कधी कधी पाऊस म्हणजे सुखवणारी आठवण निळ्या आकाशात गर्द काळे ढग, पुन्हा गर्दी करून दाटतील आठवणी तुझ्या, मनात माझ्या, नव्याने संसार थाटतील पावसाच्या आगमनानंतर दोन सख्यांच्या आपल्या प्रियकरासाठीच्या भावना आता ऐकू या.

मंडळी, या पावसाची किती रुपं वर्णावी रिमझिम पाऊस..मुसळधार पाऊस, श्रावणातला ऊनपाऊस..अन् आषाढातला विजांचा गडगडाटी पाऊस अन् तडाखे देणारा वादळी पाऊस.

पावसाची जशी विविध रूपं, तशीच पावसाशी निगडित भावनांचीही...

ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट, गारठलेल्या संध्याकाळी हिरवी चिंब पायवाट...कोणी धावताना धडपडतोय़ कोणी कोणाला सावरतय, कोणी सखीचा हात धरताना मनातल्या मनात बावरतोय, बरसणाऱ्या धारांमधे कोणी शोधतोय हरवलेले क्षण. तर कोणी पावसात आसवे लपवून हलके करतोय आपले मन.

कोणासाठी गर्द गहिरा कोणासाठी हिरवे रान, पाऊस म्हणजे वेगळीच धुंदी...हरपून जाई मनाचे भान. पावसाच्या वेगवेगळ्या रूपांमधे कधी मनावर मोरपीस फिरवणाऱ्या, तर कधी घाबरवून टाकणाऱ्या विविधरंगी भावना अनुभवू या या मेडलीतून -

वरुणराजाच्या आगमनानंतर प्रेमिकांच्या मनातील भावना ऐकू या यापुढील गीतांमधून... पहिलं गीत आहे पारख चित्रपटातील. गीतकार शैलेंद्र यांची ही अजरामर कलाकृती, सलील चौधरी यांचे सदाबहार संगीत आणि गानसम्राज्ञी लतादीदींचा चिरतरुण आवाज, राग खमाज मधे.

मैफिलीची सांगता करू या आणखी एका चिंब भिजवणाऱ्या गीतपुष्पाने. ते गायलंय शंकर महादेवन आणि प्रीती कामत यांनी. गीतकार व संगीतकार आहेत अजय-अतुल. ऐकू या, चिंब भिजलेले...

कार्यक्रमाच्या शेवटी सादर करतोय एक असं गीत... संगीत फारसं कळत नसलेल्या कोणीही हे गीत मनापासून गायलं तर उपस्थित असणाऱ्या प्रत्येकाचा अंगावर रोमांच उभं राहिल्याशिवाय रहाणार नाही. हे गीत आहे आपले राष्ट्रगीत. प्रतीक... स्वाभिमान, देशभक्ती व देशप्रेमाचे... राष्ट्रगीतातूनच योजली आहे मानवंदना. इथे मान्यवरांना ज्यांनी भारतीय कला आणि संगीताने भारताचे समस्त जगात अढळ स्थान निर्माण केले आहे. विनंती आहे सर्वांना... राष्ट्रगीताच्या सन्मानार्थ आपण उभे राहू या.

**- डॉ. कल्पिता मुळये, डॉ. जयश्री पवार**
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

**ऑगस्ट २०१७ ते जून २०१८ या कालावधीतील वृत्तांत**

लहान मुलांवर संस्कार होण्यासाठी पूर्व प्राथमिक विभागात होणाऱ्या सणांच्या निमित्ताने -

दिव्यांच्या अवसेचे निमित्त साधून सर्व दिव्यांची पूजा करण्यात आली. नागपंचमीला वारूळ करून नागोबाची पूजा करून त्याचे महत्त्व सांगण्यात आले. रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीचा पवित्र नात्याचा सण साजरा करण्यात आला. मुलींनी मुलांना राखी बांधली. कृष्णाच्या वेशातील मुलांनी दहीहंडी फोडून हा सण साजरा केला व त्याचा प्रसाद म्हणून सर्व विद्यार्थ्यांना दही-पोहे प्रसाद देण्यात आला. शाडूची गणेशमूर्ती आणून गणेशोत्सव साजरा करण्यात आला. गणपती बाप्पाची मनोभावे पूजा व आरती केली.

वर्षातील सर्वात मोठा सण 'दिवाळी'. हा सण खूप उत्साहात साजरा केला. ह्या दिवशी सर्व वर्गात कंदील लावून दारासमोर रांगोळी काढली होती. किल्ला केला व ध्वनिप्रदूषण होऊ नये म्हणून आवाजविरहित फटाके वाजवण्यात आले.

मुलांना आणखी वेगळे प्रत्यक्ष कलाकृतीचे ज्ञान मिळावे यासाठी आकार, आहार व रंग सप्ताह घेण्यात आला. आहार सप्ताहात विविध प्रकारच्या कोशिंबिरी, उसळी, भाज्या, फळभाज्या यांची ओळख करून देण्यात आली.

आकार सप्ताहात वेगवेगळ्या आकाराच्या वस्तू उदा. गोल, त्रिकोन, चौकोन अशा विविध आकारांची ओळख करून देण्यात आली व त्यासाठी त्या त्या वस्तूचे प्रदर्शन मांडण्यात आले. तसेच रंगांची ओळख मुलांना करून देण्यात आली. उदा. लाल, पिवळा, निळा अशा विविध रंगाचे प्रदर्शन भरवण्यात आले.

**क्रीडामहोत्सव** : दरवर्षी प्रमाणे मुलांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. त्याच प्रमाणे शाळाबाह्य स्पर्धाही घेण्यात आल्या. त्यामध्ये कलाचिल्ड्रन रंगभरण स्पर्धेत १० मुलांना सुवर्णपदकं मिळाली. स्त्री-कल्याण स्पर्धेतर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत लहान व मोठ्या शिशुतील मुलांना अभिनय गीत व गोष्ट यामध्ये स्वरा महाडिक, गौरी चिखले व विराज हंबीरकर यांना बक्षीस मिळाले.

**स्नेह संमेलन व बक्षीस वितरण समारंभ** : लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. या वर्षी आमच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणी बालकलाकार स्वरा सुनील जोशी हिला बोलावले होते. तिने अनेक सिनेमा व दूरदर्शन मालिकांमध्ये काम केले व कार्यक्रमाचे अध्यक्षपद मंडळाचे कार्यवाह श्री. उत्तम जोशी यांनी भूषविले होते.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा आमच्या बाईंनी आम्हाला 'देव' हा विषय स्नेहसंमेलनासाठी दिला. त्यातील काही निवडक गाणी १) अष्टविनायका तुझा महिमा २) तुला खांद्यावर घेईन, तुला पालखीत मिरविन ही गाणी. तर बालवाडी पूर्व विभागातील मुलांनी, 'देवबाप्पा देवबाप्पा नवसाला पाव' व 'देवा तुझे किती सुंदर आकाश' ही गाणी सादर केली. या कार्यक्रमात मुलांना क्रीडामहोत्सवाची व इतर स्पर्धांची बक्षीसे पाहुणी कलाकाराच्या हस्ते देण्यात आली.

**अल्पोपहार** : या दिवशी मुलांना समोसा व जिलेबी देण्यात आली.

---

जीवनात कोणतीही गोष्ट गरजेपेक्षा जास्त मिळाली की ती विष बनते मग ती ताकत असो, गर्व असो, पैसा असो, भूक असो किंवा सत्ता असो.

मकरसंक्रांतीच्या सणाला तिळगुळ घ्या गोड गोड बोला असे म्हणत हळदी-कुंकू समारंभ केला व त्यांना काळ्या रंगाचे महत्त्व सांगितले.

दरवर्षीप्रमाणे मोठ्या शिशू या वर्गाची होळी साजरी करण्यात आली. त्यासाठी मुलांना संध्याकाळी शाळेत बोलावण्यात आले व त्यांना होळी पेटवून दाखविण्यात आली व नंतर खाऊ देऊन घरी पाठवण्यात आले.

मोठ्या शिशुतून १ लीत जाणाऱ्या मुलांना व बालवाडी पूर्व (नर्सरी) मधून लहान शिशूत जाणाऱ्या मुलांचा निरोप समारंभ करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे निरीक्षण पद्धतीने लहान व मोठ्या शिशू वर्गाची व बालवाडी पूर्व वर्गाची परीक्षा घेण्यात आली.

सन २०१७-२०१८ यावर्षी सुरू करण्यात आलेल्या बालवाडी पूर्व (नर्सरी) वर्गाची चित्ररुपी सजावट मे महिन्यात करण्यात आली.

अशा या रंगरंगोटी युक्त वर्गाचे उद्घाटन १४ जून रोजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्याच वेळी मंडळाचे ज्येष्ठ पदाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापकही उपस्थित होते.

नव्याची नवलाई काही अवर्णनीय असते. याचे कारण १५ जून २०१८ ला डॉ. बेडेकर विद्या मंदिरातील पूर्व प्राथमिक विभागातील शिक्षकांनी अनुभवाला नवीन वर्ग, नवीन मुलं सारे काही नविनच होते. याचे कारण लहान शिशू, मोठा शिशू व बालवाडी पूर्व (नर्सरी) ची शालेय वर्षाची सुरुवात. या दिवशी पूर्व प्राथमिक व प्राथमिक बालवाडी पूर्वचे सर्व वर्ग पताका व फुगे यांनी सजवलेले होते व सर्व मुलांचे स्वागत त्यांना गोळ्या देऊन करण्यात आले.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्गात पूर्व प्राथमिक व बालवाडी पूर्व (नर्सरी) या विभागात एकूण ६ शिक्षक, १ लिपिका, २ सेविका कार्यरत असून बालवाडी पूर्व (नर्सरी), लहान व मोठा शिशुचे विद्यार्थी हसत खेळत शिक्षण घेत आहेत. या तिनही विभागांची मुलांची पटसंख्या २५४ आहे.

अशा आमच्या या पूर्व प्राथमिक विभागाची प्रगती विद्या प्रसारक मंडळाच्या सहकार्याने व प्रोत्साहनामुळे होत असते. ह्या बद्दल आम्ही विद्या प्रसारक मंडळाचे शतशः आभारी आहोत.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

### सन २०१७-१८ वार्षिक निकाल

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात ५४१ विद्यार्थी शिकत होते. वार्षिक परीक्षेचा निकाल १००% लागला असून शासनाच्या आर.टी.ई. नियमानुसार शाळा समृद्धीची १० मानके पूर्ण करून शाळेने 'अ' श्रेणी प्राप्त केली आहे.

| इयत्ता | एकूण विद्यार्थी | 'अ'श्रेणी प्राप्त विद्यार्थी | 'ब'श्रेणी प्राप्त विद्यार्थी | 'क'श्रेणी प्राप्त विद्यार्थी | 'ड'श्रेणी प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| इ.१ली | १२५ | ९४ | २८ | ३ | - |
| इ.२री | १०० | ८२ | १८ | - | - |
| इ.३री | १७२ | १३९ | २८ | ५ | - |
| इ.४थी | १४४ | १०८ | ३४ | २ | - |

### नवागतांचे स्वागत व शासनातर्फे मिळणाऱ्या पाठ्यपुस्तकांचे वाटप

शुक्रवार दि. १५/६/२०१८ रोजी इ. १लीतील नवोदित विद्यार्थ्यांचे गोळ्या वाटून स्वागत करण्यात आले.

जोपर्यंत मनाला आशेचे पंख आहेत, अंतःकरणात जिद्द आहे, डोळ्यांसमोर खुले आकाश आहे, तोपर्यंत येणारा प्रत्येक क्षण आपलाच आहे.

तसेच 'सर्व शिक्षा अभियान' अंतर्गत शासनाकडून आलेल्या शालेय पाठ्यपुस्तकांचे मोफत वाटप शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. गणेश कदम, शाळा व्यवस्थापन समितीचे शिक्षणतज्ज्ञ मा. मुख्याध्यापक श्री. पांचाळ सर, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्नेहल कुडव यांच्या हस्ते करण्यात आले.

**आंतरराष्ट्रीय योगदिन**

२१ जून २०१८ ह्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून इ.१ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांचा 'योगदिन' साजरा केला. त्या दिवशी या दिनाचे व आरोग्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. योग प्रार्थना, ध्यानस्थिती प्राणायाम, कपालभारती, ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन इ. आसने करून घेतली. शिक्षकांनी प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले.

**प्लास्टिक बंदी जनजागृती**

सरकारी नियमानुसार प्लॅस्टिक बंदीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी त्यांना २३ जून २०१८ रोजी सभागृहात नेऊन शिक्षकांनी महत्त्व सांगितले.

**पालक सभा**

शनिवार दि. ३० जून २०१८ रोजी इ.१ली ते ४ थीच्या सर्व पालकांची सभा घेण्यात आली. सभेमध्ये पालक-शिक्षक संघ व माता पालक संघाची स्थापन करण्यात आली.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- दिनांक ३१ मे २०१८ रोजी मुख्याध्यापक श्री. गढरी सर निवृत्त झाले. तर दि. १ जून २०१८ पासून श्री. पांचाळ सर यांनी मुख्याध्यापक पदाची धुरा सांभाळली.
- शालांत परीक्षा मार्च २०१८ च्या निकालापासून कु. फुलसुंदर सायली रमेश ही विद्यार्थिनी ९६% गुण मिळवून शाळेत प्रथम आली. १०४ विद्यार्थी विशेष श्रेणीत, १०५ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी, ५४ विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणी, १२ विद्यार्थ्यांना तृतीय श्रेणी प्राप्त झाली तर ६ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. शाळेचा एकूण निकाल ९८.२०% लागला.
- दि.१५ जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी इ.५वीच्या सर्व चिमुकल्यांचे पेन व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी इ.५वीचे सर्व वर्ग शिक्षक, मा. मुख्याध्यापक श्री. पांचाळ सर, उप. मुख्याध्यापक श्री. बागुल सर उपस्थित होते. सदर स्वागत प्रसंगी सर्व वर्गशिक्षक व विषय शिक्षक यांची ओळख करून देण्यात आली. तसेच शालेय शिस्त व शाळेची माहिती देण्यात आली.
- इ. ५वी ते ८ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे मान. मुख्याध्यापक श्री. पांचाळ सर व उप. मुख्याध्यापक श्री. बागुल सर यांच्या हस्ते पाठ्यपुस्तक वितरण करण्यात आले.
- यंदा नव्यानेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संस्थेतर्फे गायनाचा वर्ग व आपले माजी विद्यार्थी श्री. प्रफुल्ल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली बासरी वादनाचा वर्ग सुरू करण्यात आला आहे. सदर वर्ग विनामूल्य घेण्यात येत आहे.
- सन २०१८ च्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल दि. ८ जुलै रोजी लागला. निकालानुसार इ.५वीचे ६ विद्यार्थी आणि इ.८ वीचे ६ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

---

श्वास व विश्वास दोन्ही अदृश्य आहेत परंतु दोघात इतकी ताकद आहे की
अशक्य गोष्टीला शक्य बनवून देतात.

- नैसर्गिक आपत्तीवर आधारित 'नॅचरल डिझास्टर' हा लघुचित्रपट इ.५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी दाखविण्यात आला.
- २१ जून 'आंतरराष्ट्रीय योगदिना' निमित्त सहयोग मंदिर घंटाळी ठाणे, सभासद / सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली इ. ८ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांनी 'योगदिन' साजरा केला. यात प्रात्यक्षिकासह योगासनांचे विविध प्रकार व त्यांचे दैनंदिन जीवनातील महत्त्व समजावून सांगण्यात आले.
- महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा २०१८ च्या निकालानुसार इ.१०वी अ मधील कु. रुद्र शशांक जेवळीकर हा राज्यात ५ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला.
- शाळेचे माजी वरिष्ठ लिपिक श्री. देवराम गवई यांचे दि. ५ जून रोजी आकस्मिक निधन झाले.
- दि. १४ जुलै २०१८ रोजी शिक्षक-पालक सभा घेऊन शालेय व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**मार्च २०१८ च्या माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल :**

एकूण विद्यार्थी - १२७

परीक्षेला बसलेले विद्यार्थी - १२७

उत्तीर्ण विद्यार्थी - १२१

टक्केवारी - १००%

विशेष प्रावीण्य - १०४

प्रथम श्रेणी - २१

द्वितीय श्रेणी - ०२

तृतीय श्रेणी - ००

| टक्के | विद्यार्थी संख्या | % |
|---|---|---|
| ९० आणि अधिक | ६१ | ४८.०३ |
| ८०-८९ | ३० | २३.६२ |
| ७०-७९ | २६ | २०.४७ |
| ६०-६९ | ०८ | ०६.३० |
| ५०-५९ | ०२ | ०१.५८ |
| ४९ च्या खाली | ०० | ०० |

**पहिले दहा क्रमांक :**

| क्र. | विद्यार्थ्यांची नावे | % |
|---|---|---|
| १ | यश देशपांडे | ९७.४० |
| २ | सोहम शिंपी | ९६.८० |
| २ | अदिती सूर्यवंशी | ९६.८० |
| २ | नेत्रा भट | ९६.८० |
| ३ | प्रियंका गोस्वामी | ९६.४० |
| ४ | अनुष्का गात | ९६.०० |
| ४ | दृष्टी सावला | ९६.०० |
| ४ | वेदांत बडवने | ९६.०० |
| ५ | विश्वराज बोरकर | ९५.८० |
| ५ | चिन्मयी राईलकर | ९५.८० |
| ५ | सिमरन पेंढारकर | ९५.८० |
| ५ | ध्रुव देवरे | ९५.८० |
| ६ | प्रथमेश ठाकूर | ९५.४० |
| ६ | मृण्मयी कानिटकर | ९५.४० |
| ७ | खुशी जोशी | ९५.२० |
| ८ | श्रेया दातार | ९५.०० |
| ८ | निमिशा जैन | ९५.०० |

आपल्या प्रतिष्ठेचा खूप चांगला सांभाळ करा कारण हीच आहे, जिचं वय तुमच्यापेक्षा जास्त आहे.

| | | |
|---|---|---|
| ९ | सरगुनदिपकौर सचदेव | ९४.८० |
| १० | ज्ञानदा जोशी | ९४.६० |
| १० | केतकी जोशी | ९४.६० |
| १० | सोहम सांगलीकर | ९४.६० |

**विषयातील सर्वप्रथम क्रमांक**

| विषय | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | अदिती सूर्यवंशी | ९५ |
| मराठी | अदिती सूर्यवंशी | ९३ |
| संस्कृत | सोहम शिंपी<br>पूर्वा भिडे<br>यश देशपांडे | ९९<br>९९<br>९९ |
| हिन्दी | वैभवी चिविलकर | ९३ |
| गणित विज्ञान | सर्वज्ञ पुरोहित<br>यश देशपांडे<br>यश कोकाणे<br>प्रथमेश वालावलकर<br>सोहम शिंपी | ९९<br>९८<br>९८<br>९८<br>९८ |
| समाज शास्त्र | यश देशपांडे<br>ध्रृव देवरे<br>केतकी जोशी | ९८<br>९८<br>९८ |

**संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षा २०१७-१८ चा निकाल : १००%**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी - ३१

ब्राह्मण सेवा संघ आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेतील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी :

१) श्रीया दानेकर - प्रथम क्रमांक

२) आयुष म्हात्रे - दुसरा क्रमांक

३) मिहीर गोरे - चौथा क्रमांक

४) अवनी साठे - पाचवा क्रमांक

५) सिद्धार्थ वेरणेकर - पाचवा क्रमांक

६) तन्वी गद्रे - आठवा क्रमांक

७) वेद वाजे - नववा क्रमांक

८) सिया चौधरी - पंधरा क्रमांक

**एप्रिल -२०१८ च्या बालवीर राज्य पुरस्काराचा निकाल :**

राज्य पुरस्कार मिळालेल्या बालवीरांची नावे खालील प्रमाणे :

१) कु. अर्थव पानसरे

२) कु. अर्णव तावडे

३) कु. रुचिर चित्रे

४) कु. मल्हार कावळे

५) कु. आयुष म्हात्रे

**टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल : फेब्रु .२०१८**

| इ. | परीक्षेला बसलेले विद्यार्थी | प्राावीण्य प्राप्त विद्यार्थी | प्रथम श्रेणीत उत्तीर्ण | द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण | तृतीय श्रेणीत उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ५वी | ०५ | - | ३ | १ | १ |
| ६वी | ०६ | २ | ३ | १ | - |
| ७वी | ०५ | - | ४ | - | - |
| ८वी | ०६ | ५ | १ | - | - |

बुडणाऱ्यांना किनाऱ्यावरून सूचना देतात ते सामान्य आणि स्वत:चा जीव धोक्यात घालून त्यांना वाचवतात ते असामान्य !

**सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :**

| इ. | नाव | गुण |
|---|---|---|
| ५वी | भूमिका चोरगे | ८० |
| ६वी | स्वरांगी वस्ते | ८७ |
| ७वी | प्रत्युष त्रिपाठी | ७८ |
| ८ वी | सिद्धार्थ वेरणेकर | ९७ |
| ९ वी | वेद वाजे | ९७ |

**Spell Bee International आयोजित राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेचा निकाल :**

**पदक प्राप्त विद्यार्थ्यांची नावे :**

१) आर्या पेंडसे - ९६.७५%

२) अवनी साठे - ९१.५०%

३) रमा राईलकर - ९०.००%

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**प्रा. नीलम शेख यांना पीएच. डी.**



महाविद्यालयातील प्रा. नीलम शेख यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य विद्याशाखेस - Study of Investors Response to Price Variations in Share Prices of Financial Sector Companies listed on Bombay Stock Exchange in India या विषयावर लिहिलेल्या प्रबंधाला पीएच. डी. पदवी २१ एप्रिल २०१८ रोजी मिळाली.

महाविद्यालयाच्या प्र-प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांनी डॉ. नीलम शेख यांचे अभिनंदन केले आहे.

**आंतरराष्ट्रीय योग दिवस**




दि. २१ जून २०१८ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस संपन्न झाला. महाविद्यालयाच्या विवेकानंद अभ्यासकेंद्र, एनसीसी आर्मी गर्ल्स व राष्ट्रीय सेवा योजना व विवेकानंद केंद्र ठाणे यांच्या सहभागाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्र-प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक म्हणाल्या की, 'स्वतः स्वतःला भेटणं म्हणजे योग.' कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. वरदराज बापट व ऋचा सावरगावकर उपस्थित होते. त्यांनी काही आसने व प्राणायाम करून दाखवले. विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ. पंकज जैन यांचे अभ्यागत व्याख्यान




दि. २३ जून २०१८ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात नॉर्थ टेक्सस विद्यापीठ, अमेरिका येथील तत्त्वज्ञान विभागातील प्राध्यापक डॉ. पंकज जैन यांचे 'धर्म व पर्यावरण' या विषयावर अभ्यागत व्याख्यान सम्पन्न झाले. महाविद्यालयाच्या प्र-प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी प्रास्ताविक करताना, 'धारयती स धर्म:' अशी व्याख्या केली. डॉ पंकज जैन यांनी आपल्या व्याख्यानात 'राजस्थानातील बिश्र्नोई परंपरा व महाराष्ट्रातील स्वाध्याय परिवार यांचे पर्यावरण पूरक तत्त्वज्ञान' यावर प्रकाश टाकला.

### प्रमाणपत्र वितरण



२५ जून २०१८ रोजी व्यक्तिमत्त्व विकास व टॅली अभ्यासक्रमात यशस्वीपणे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते झाले. बारावीच्या मुलांना असलेल्या प्रदीर्घ सुटीचा उपयोग करून त्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास व टॅलीचे धडे देऊन सुट्टी खऱ्या अर्थाने सत्कारणी लावण्याच्या हेतूने डॉ. नाईक यांनी या अभ्यासक्रमाची कल्पना मांडली होती. विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

### राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी




२६ जून रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा दिवस महाराष्ट्रभर सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्यात येतो. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, इतिहास विभाग प्रमुख प्रा. सुभाष शिंदे, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे व अन्य प्राध्यापक या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

### वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान: पुष्प १५वे कौटिलीय अर्थशास्त्राची सद्यकालीन उपयोगिता: डॉ. प्रभाकर आपटे

दि. ३ जुलै २०१८ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे १५ वे पुष्प कौटिलीय अर्थशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक व डेक्कन कॉलेज पुणे येथील भूतपूर्व प्राध्यापक डॉ. प्रभाकर आपटे यांनी, 'कौटिलीय अर्थशास्त्राची सद्यकालीन उपयोगिता' या विषयावर गुंफले. या कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

कर्तव्य, कर्ज, उपकार या तीन गोष्टींचं कधीच विस्मरण होऊ देऊ नये.

प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी 'कौटिलीय अर्थशास्त्र' या ग्रंथाचा परिचय करून दिला. शिक्षकांनी निस्वार्थी भावनेने कर्म करत देश घडवावा हीच चाणक्याच्या जीवनातून शिकवण मिळते असे महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आपल्या मनोगतात म्हणाल्या. डॉ. आपटे म्हणाले की, चाणक्याने यथापराधम् दंड: असं सूत्र वापरलं आहे. अपराधाप्रमाणे दंड द्यावा. ते म्हणाले की, चाणक्य हा सम्राट चंद्रगुप्त मौर्याच्या राजसभेत महामंत्री होता. जुलमी नंद घराणेशाहीची राजवट संपवून सम्राट चंद्रगुप्ताला सिंहासनावर बसवण्यात त्यांचाच मुख्य सहभाग होता असे मानले जाते. तसेच त्याने रचलेला कौटिलीय अर्थशास्त्र हा ग्रंथ भारतीय संस्कृतीतील एक देदीप्यमान ग्रंथ मानला जातो. २५ प्रकरणे व सहा हजार श्लोक असलेला हा ग्रंथ अर्थशास्त्र व राजनीतीवर लिहिलेला मानवी इतिहासातील पहिला ग्रंथ असल्याचे मानले जाते. या ग्रंथात प्रतिपादलेल्या नीतीस 'चाणक्यनीती' वा 'दंडनीती' म्हणून ओळखतात. प्राचीन संस्कृत भाषेत फारच थोडे लिखाण गद्यात आढळते. कौटिलीय अर्थशास्त्र हा अशा मोजक्या गद्य संस्कृत साहित्यातील एक ग्रंथ आहे.

महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले. तसेच कार्यक्रमाच्या संयोजनाची जबाबदारी डॉ. महेश पाटील यांनी सांभाळली.

**डॉ. नितीन जोशी यांचे व्याख्यान**

विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. नितीन जोशी यांचे महाविद्यालयाच्या IQAC विभागातर्फे व्याख्यान



आयोजित केले गेले. प्राध्यापकांनी शिकवताना नवनवीन कल्पना उपयोजित कराव्या. आपल्या वर्गात आपणच सर्वेसर्वा असतो. या वेळेचा उपयोग विद्यार्थ्यांना नवनवीन प्रकल्प व अध्ययन-कला विकसित करण्यासाठी करावा. एखादी कल्पना फलद्रूप झाली नाही तर हा एकमेव धोका पत्करायला शिकले पाहिजे असे डॉ. जोशी म्हणाले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी प्रास्ताविक केलं, तर प्रा. नीता पाठक यांनी संयोजनाची जबाबदारी सांभाळली. या व्याख्यानास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या अकरावी आणि बारावी विज्ञान शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल खालील प्रमाणे आहे.**

| इयत्ता | प्रथम वर्ग प्रथम श्रेणी | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी | द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | तृतीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|
| अकरावी | ४८ | १७५ | २११ | १० | ९४.६७ |
| बारावी | ११३ | १९७ | १२८ | १४ | ९६.९ |

आवड आणि आत्मविश्वास असेल तर कोणतीही गोष्ट अवघड नाही.

**प्रत्येक शाखेतील पहिले तीन विद्यार्थी**

| क्रमांक | अकरावी | | बारावी | |
|---|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | गुजर एकता शांताराम | ८६.४६ % | दीक्षित गंधाली घनश्याम | ९४.९२% |
| द्वितीय क्रमांक | झा आशिषकुमार मिहीरकुमार | ८६.३१% | जावडेकर तनय आशिष | ९३.६९% |
| तृतीय क्रमांक | भोईर पार्थ सूर्यकांत | ८५.३८% | गुप्ता रोशनी रमेशकुमार | ९२.००% |

**अकरावी इयत्तेमध्ये विषयवार पहिले आलेले विद्यार्थी**

| अ. क्र. | विषय | विद्यार्थ्याचे नाव | एकूण गुण १००पैकी |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | सावंत अनुष्का अंकुश | ९० |
| २ | मराठी | पाटील नम्रता राजू<br>गाडगे सायली गुलाब | ८४<br>८४ |
| ३ | हिंदी | झा समीर शिवराम<br>औताडे गौरव विलास | ९०<br>९० |
| ४ | संस्कृत | मोरे स्वरांगी लक्ष्मीकांत | ८५ |
| ५ | गणित | यादव संदीप संजय | ९८ |
| ६ | भौतिकशास्त्र | सिंग अर्चिता तेजभान | ८६ |
| ७ | रसायनशास्त्र | दवणे सुबोध अशोक<br>कांबळे निखिल विकास<br>गुजर एकता शांताराम | ८९<br>८९<br>८९ |
| ८ | जीवशास्त्र | दवणे सुबोध अशोक | ८९ |
| ९ | संगणक शास्त्र | गुजर एकता शांताराम | ९५/२०० |

**बारावी इयत्तेमध्ये विषयवार पहिले आलेले विद्यार्थी**

| अ. क्र. | विषय | विद्यार्थ्याचे नाव | एकूण गुण १००पैकी |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | पवार ऋतुजा कुणाल | ८९ |
| २ | मराठी | वानखेडे आदित्य संजय | ९१ |
| ३ | हिंदी | कनोजिया अमन रामबली<br>गुप्ता रोशनी रमेशकुमार<br>मोरे ऐश्वर्या राजेंद्र | ९०<br>९०<br>९० |
| ४ | संस्कृत | सावजी पद्मजा मोरेश्वर | ८४ |
| ५ | गणित | जावडेकर तनय आशिष<br>गुप्ता रोशनी रमेशकुमार | १००<br>१०० |
| ६ | भौतिकशास्त्र | जावडेकर तनय आशिष | ९९ |
| ७ | रसायनशास्त्र | दीक्षित गंधाली घनश्याम | ९५ |
| ८ | जीवशास्त्र | गुप्ता रोशनी रमेशकुमार<br>जोशी रोहित शैलेश | ९५<br>९५ |
| ९ | संगणक शास्त्र | दीक्षित गंधाली घनश्याम | १९४/२०० |

**'बांदोडकरमध्ये ४ थ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन'**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात गेली १६ वर्षे श्री अंबिका योग कुटीराच्या मदतीने योगाभ्यासाचे वर्ग घेतले जातात. या मध्ये शिक्षक, शिक्षकेतर सहकारी व सर्व विद्यार्थी यांचा सहभाग असतो. या वर्षी ४ थ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून २०१८ रोजी संयुक्तरित्या एका भव्य सामुदायिक योगासनांच्या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या पतंजली योग केंद्रामध्ये करण्यात आले.



राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, जिमखाना व योग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने व ठाण्यातील नौपाडा प्रभागातील स्वामी विवेकानंद योग केंद्राच्या सहकार्याने या भव्य सामुदायिक योगासनांच्या प्रात्यक्षिके आणि भव्य कार्यक्रमाची योजना आखण्यात आली.

स्वामी विवेकानंद केंद्राच्या वैदेही, स्मिता चौधरी, डॉ. अंजली गांगल आणि त्यांचे सहकारी प्रदर्शक यांच्या एकत्रितपणे घेतलेल्या योगासनांच्या प्रात्यक्षिकांसह प्रार्थना, प्राणायाम, योगासनांचे विविध प्रकार महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर सहकारी असे मिळून १५२ योगसाधक यावेळी उपस्थित होते. तसेच १ महाराष्ट्र एन.सी.सी. आर्मी बटालियनचे सुभेदार मेजर राजपुत व रिझवी महाविद्यालयाचे C.T.O. खोब्रागडे हेही आवर्जून उपस्थित होते. शांतीपाठ घेऊन या योग दिवसाची सांगता झाली.

**'स्वरांजली' ऋतू हिरवा : चिंब मनाला छंद नवा**



विद्या प्रसारक मंडळाच्या संकुलात कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन व तंत्रनिकेतन या महाविद्यालयांमधील 'स्नेहवृद्धीच्या' मूळ उद्देशाने सुरू केलेल्या **'स्वरांजली'** या कार्यक्रमातर्गंत पुष्प ४ थे **'ऋतू हिरवा : चिंब मनाला छंद नवा'** हे ज्ञानद्विपावरील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात २२ जून २०१८ रोजी सायंकाळी बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी संगीत मैफिलीत सादर केले.

या सूरसंध्येमध्ये, पावसासंबंधी विविध कविता, चित्रपटगीते, हिंदी व मराठी शास्त्रीय रागांवर आधारित गाण्यांचे सादरीकरण करण्यात आले. पावसाची नानाविध रूपे आणि त्याप्रमाणे त्याच्याशी निगडित भावभावनांचे विविध रंग उलगडणाऱ्या एकापेक्षा एक सरस कलाकृतींचे, अभिव्यक्तीचे सादरीकरण या कार्यक्रमात केले गेले. आबालवृद्धांना भावणाऱ्या पावसाच्या सादर केल्या गेलेल्या विविध सांगीतिक छटांमुळे कार्यक्रम खूप रंगला.

या मुक्त व्यासपीठावरील सहभागी कलाकार होते. कु. धनश्री पवार, कु. पल्लवी बुलाखे, कु. चिन्मयी शुक्ल, डॉ. सिद्धीशा कुर्वे, सायली दप्तरदार, श्री. आशुतोष

जोशी आणि डॉ. अश्विनी टिळक हे सगळे विद्या प्रसारक मंडळाच्या कुटुंबातील सदस्य! उत्कृष्ट वाद्यवृंदाची साथ केली श्री. अभिषेक दांडेकर, श्री.अमोघ दांडेकर, हर्ष परमार व कु. चिनार कोकजे यांनी आणि डॉ. कल्पिता मुळ्ये व डॉ. जयश्री पवार यांनी निवेदन केले.

शैक्षणिक प्रगतीबरोबरच विद्यार्थी व शिक्षकांमधील कलागुणांना हेरून यांना व्यासपीठ निर्माण करून देण्याच्या विद्या प्रसारक मंडळाचा हा उपक्रम अतिशय स्वागतार्ह आहे.

**'कागदी पिशवी बनवण्याची कार्यशाळा'**




घन कचरा व त्याचे व्यवस्थापन ही सर्वांना भेडसावणारी समस्या आहे. सरकारतर्फे आता प्लास्टिक वापरावर निर्बंध अमलात येणार आहे. सर्वसामान्य जनता आता प्लास्टिकच्या वापराशी इतकी सराईत झाली आहे, की त्याचे दुष्परिणाम पुढच्या अनेक पिढ्यांना भोगावे लागणार आहेत याचा विचारही करत नाही.

हे टाळण्याकरता प्लास्टिक ऐवजी पर्यावरणाचा हितकारक असा कागदी अथवा कापडी पिशवी वापरणे सोयीस्कर ठरणार आहे. हीच सामाजिक गरज लक्षात घेऊन वि.प्र.मं.च्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे **'कागदी पिशवी बनवण्याची कार्यशाळा'** घेण्यात आली होती.

या कार्यशाळेत टाकाऊ कागदापासून पिशवी बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी वर्तमानपत्रापासून विविध आकाराच्या तीन कागदी पिशव्या बनवण्याचे प्रशिक्षण महाविद्यालयाच्या पर्यावरणशास्त्राच्या शिक्षकांनी दिले.

या कार्यशाळेदरम्यान सुमारे १०० कागदी पिशव्या विद्यार्थ्यांनी तयार केल्या व या बनवलेल्या पिशव्या स्थानिक फळे व भाजी विक्रेत्यांना जागतिक वसुंधरा दिनाच्या निमित्ताने वितरीत करण्यात आल्या.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करून, मिळणारे ज्ञान परीक्षेपुरते मर्यादित न ठेवता रोजच्या वापरात लागणाऱ्या गोष्टी अमलात आणून देण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यासाठी बांदोडकर महाविद्यालय विविध उपक्रम राबवीत असते.

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय)**

भावार्थदीपिकेत त्यांनी 'मी अत्यंत जडू असे। परि ऐसा ही नीके परिहसे।' अशा वृत्तीचा श्रोता आपल्या डोळ्यांपुढे ठेवला आहे. त्यामुळे साहजिकच अशाच तऱ्हेच्या विवेचन पद्धतीचा त्यांनी अंगीकार केला. त्यांच्या निरुपणात खंडणमंडणाचा अभिनिवेश नाही, वाद जिंकण्याची जिद्द नाही, तर सर्वसामान्य लोकांचे धर्म जीवन उच्च पातळीवर नेण्याची तळमळ आहे. सामान्यजनांविषयी त्यांच्या अंतःकरणात उत्कट सहानुभूती आहे. म्हणूनच ज्ञानी पुरुषांनी दैनंदिन व्यवहारात अलौकिकत्व मिरवू नये, आपली कर्तव्ये पार पाडून इतर लोकांना धडा घालून द्यावा असे त्यांनी आवर्जून सांगितले आहे.''

न्यायमूर्ती रानडे यांनी 'Rise of the Maratha Power' या आपल्या ग्रंथात अत्यंत व्यापक व समतोल बुद्धीने संत चळवळीचे समालोचन केले. शिवकालीन राजकीय आंदोलनाची वैचारिक पार्श्वभूमी संत मंडळींच्या कार्यांतूनच तयार झाली असा त्यांच्या विवेचनाचा सूर आहे.

ज्ञानेश्वर तुकारामादी संतांचे कार्य हे केवळ सांप्रदायिक स्वरूपाचे नसून ती एक व्यापक चळवळ होती. तीच चळवळ आज वारीच्या रुपाने आज पाहतो. संतांचा संप्रदाय केवळ विठ्ठलोपासकाचा एक साधासुधा भक्तिपंथ नव्हता तर शैव, नाथ, दत्त, चैतन्य, सुफी इत्यादी पंथातील उदार, चिंतनशील व संस्कारक्षम भक्तजनांना सामावून घेणारे ते एक सर्व संग्राहक व्यासपीठ होते.

संप्रदाय, भक्ती, वारी सोबतच मराठी भाषेला साहित्य सोनियाच्या खाणी संतांनी दिल्या. ज्ञानोबांनी मराठी मुलुखात ब्रह्मविद्येचा सुकाळ करत विवेकवेलीची लावणी केली. मराठी भाषेला अमृतातेही पैजा जिंकणारी शब्दकळा दिली. वि. का. राजवाडे या इतिहासकाराने मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाच्या आठव्या खंडाच्या प्रस्तावनेतील विवेचनात असे नमूद केले की 'ज्ञानेश्वर एकनाथ, नामदेव, तुकाराम इत्यादी संताच्या साहित्यामुळे फारसी भाषेच्या वर्चस्वापासून मराठी भाषेचे रक्षण झाले. तसेच हे ग्रंथकार नसते तर 'मराठीची एखादी निराळीच भाषा बनती आणि निराळी भाषा बनल्यावर मराठ्यांचे राष्ट्र असे शब्द वापरता आले नसते. इतकेच नव्हे तर हे ग्रंथकार नसते तर सतराव्या शतकात झालेली स्पृहणीय राज्यक्रांती झालीच नसती' (प्रस्तावना खंड पृ.३९५)

ज्ञानदेव व नामदेव यांचा काळ तेराव्या शतकाचा उत्तरार्ध व चौदाव्या शतकाचा पूर्वार्ध असा होता. त्यानंतर सुमारे १०० वर्षांनी एकनाथांचे पणजे भानुदास हे पैठणात जन्मले. विजयनगरच्या तत्कालीन राजाने पांडुरंगाची मूर्ती आपल्या राजधानीत नेली असता भानुदासांनी आपल्या भक्तीच्या बळावर ती पंढरपूरला परत आणली. पुढे याच कुटुंबात जन्माला आलेले संत एकनाथ यांनी भागवत धर्माच्या मंदिराला 'एकनाथी भागवत' या ग्रंथाच्या रुपाने खांब दिला. 'जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत।।'

संत एकनाथांचे कार्य महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत अमूल्य आहे. तत्कालीन निजामशहाच्या अंमलाखालील पैठण हे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत होते. हिंदूंच्या देवळाची मोडतोड करून मशिदी उभ्या करणे, स्वराज्याचा लोप होणे, तीर्थस्थळांचा विध्वंस करणे, यात्रा-उत्सवांवर प्रतिबंध लादणे अशा गोष्टी घडत असताना एकनाथांनी मराठी जनतेला 'भारुड' अभंग, 'गवळण', 'भावार्थ रामायण', 'चिरंजीवपद' इत्यादी माध्यमांनी पुनरुज्जीवीत केले. एकनाथांमुळे महाराष्ट्रातील बहुसंख्य जनता अन्य धर्मात धर्मांतरित झाली नाही.

---

जगायचे तर दिव्याप्रमाणे जगा, जो राजाच्या महालात आणि गरीबाच्या झोपडीत एक सारखाच प्रकाश देतो!!

प्रा. न. र. फाटक म्हणतात –

''महाराष्ट्रातील देवधर्म संप्रदायाच्या रुपाने जी संघटना ज्ञानेश्वरांपासून अस्तित्वात होती, तिचे शुचित्व व कर्त्यापुरुषांच्या अभावी या संघटनेला आलेले दैन्य एकनाथांच्या शिकवणीने नाहीसे झाले. लोकांमध्ये देवधर्माच्या अभिमानाचा उल्हास संचारला आणि यालाच पुढे पन्नास वर्षांनी स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नाचे फळ येऊन त्याचा परिपाक महाराष्ट्रातील जनतेस भोगावयास मिळाला.''

नामदेवांनी वारकरी परंपरा पंजाबातील 'घुमान' पर्यंत नेली व 'गुरुग्रंथसाहिब' या शिखांच्या पवित्र ग्रंथांत त्यांचे अभंग समाविष्ट झाले. तर एकनाथांनी मराठी संस्कृत पांडित्यांचे आगर असलेल्या काशी पर्यंत पोचवली.

तुकाराम महाराजांचा काळ वारकरी संप्रदायाचा कळसाध्याय आहे. एका बाजूला छत्रपती शिवाजी महाराज मराठी मुलुखास स्वराज्य देत होते, तर दुसऱ्या बाजूला समर्थ रामदास स्वामी भगवान रामचंद्रांचे आवाहन करून परकीय आक्रमणापासून एतद्देशीयांना बंड करावयास लावत होते.

**'देव मस्तकी धरावा। अवघा हल्लकल्लोळ करावा।।'**

असा संदेश देत होते. ज्यांना स्वधर्म, स्वतःची भाषा व संस्कृतीची कदर नाही तो समाज मोठा होत नाही. 'ज्यांना उजळ माथ्याने देव डोक्यावर मिरवता येत नाहीत ते अशक्त लोक स्वराज्य कसे स्थापणार?' असा रोकडा सवाल करत रामदासांनी देखील महाराष्ट्राच्या संत परंपरेत मोलाचे योगदान दिले.

तुकाराम महाराजांनी समाजाला व्यवहारधर्म सांभाळत परमेश्वराच्या जवळ जाण्यास सांगितले. तुकोबांचे सध्या माध्यमांमध्ये मालिकांच्या माध्यमातून जे चित्रिकरण दाखवतात ते एकांगी असून तुकोबा ब्रह्मांड भेदून आकाशा एवढा होणारा प्रज्ञासूर्य आहे.

**'संकोचोनी काय झालासी लहान।**
**घेई आपोषण ब्रह्मांडाचे।।'**

असे तुकोबा सांगतात.

विंदा करंदीकर या प्रतिभावान कवीने तुकोबा व शेक्सपिअर या समकालीन कवींची भेट आपल्या विलक्षण कवितेत घडवून आणली. दोघांची भेट झाल्यावर विल्यम शेक्सपिअर तुकोबांना म्हणतो –

**''तुका म्हणे विल्या। कर्म तुझे थोर।**
**अवघाची संसार। उभा केला।**
**शेक्सपीअर म्हणे। एक ते राहिले।**
**तुवा जे पाहिले। विटेवरी।**
**शेक्सपीअर म्हणे। तुझ्या शब्दांमुळे।**
**मातीत खेळले। शब्दातीत।।**
**तुका म्हणे गड्या। वृथा शब्दपीट।**
**प्रत्येकाची वाट। वेगळाली।।**
**वेगळीये वाटे। वेगळाले काटे।**
**काट्यांतूनी भेटे। पुन्हा तोचि।।**
**दोघे निघोनिया। गेले दोन दिशा।**
**कवतिक आकाशा। आवरेना।।''**

वरील काव्यात्म संवाद तुकोबांच्या प्रतिभेच्या चांदण्याला दिलेली करंदीकरांसारख्या द्रष्ट्या कवीची सुमनांजलीच म्हणावी लागेल. प्रत्येकाच्या वेगळ्या वाटेवरील काट्यांमधूनही 'तोच' पुन्हा भेटतो हा विचार आधुनिक पिढीसाठी मार्गदर्शक म्हणायला हवा.

तुकोबांनी वेदवाणी सोप्या भाषेत लोकांना सांगितली. विल्यम वर्डस्वर्थ या कवीने कवितेच्या भाषेसंदर्भात म्हटलं की, 'Language of Poetry should be language of common and rustic men'.

अर्थात कवीची भाषा जनभाषा असावी. तुकोबांचे अभंग आज देखील मराठी भाषेतील अलंकार झाले आहेत. बोलीभाषेतील कितीतरी म्हणी, ओळी तुकोबांच्या वाणीची साक्ष देतात.

सनातन वैदिक धर्माची प्रस्थानत्रयी म्हणजे 'गीता', 'उपनिषद' व 'ब्रह्मसूत्र' असून वारकरी संप्रदायात 'ज्ञानेश्वरी', 'तुकाराम गाथा' व 'एकनाथी भागवत' याला प्रस्थानत्रयी मानल्या जाते. या तीन ग्रंथातून प्रसृत झालेल्या विराट मानव्याची संकल्पना व समता व बंधूतेचा संदेश म्हणजे आजचा वारकरी संप्रदाय. तुकाराम महाराजांच्या अभंगाचे गारुड लोकमान्य टिळक, न्यायमूर्ती रानडे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरही होते. आपल्या 'मूकनायक' या मुखपत्रात डॉ. आंबेडकर तुकोबांचा अभंग मुखपृष्ठावर उद्धृत करतात. दिलीप चित्रे या मराठी कवीने इंग्रजीत 'Says Tuka' हे पुस्तक लिहून तुकोबांना आधुनिक कवी म्हणून प्रस्थापित केले आहे.

तुकोबांनंतर संप्रदाय निळोबाराय या महापुरुषाने चालवला. त्यांच्यानंतर ३०० वर्षांत वारकरी परंपरेत शंकरस्वामी शिऊरकर, मल्लप्पा वासकर, हैबतराव बाबा, वासुदेव देहूकर, चातुर्मास्ये महाराज, साखरे महाराज, विष्णुबुवा जोग, दादामहाराज सातारकर, केशवराव देशमुख, बंकटस्वामी, लोहिया महाराज, प्रा. शं. वा. दांडेकर इ. अनेक कर्तबगार मंडळी होऊन गेली.

आज हीच परंपरा वारीच्या रुपाने आपणास पाहण्यास मिळते. सर्व जातीधर्मांतील लोक पांडुरंगाच्या भेटीची आस घेऊन मार्गस्थ होताना 'ज्ञानोबा तुकाराम' या अमृतवाणीचा जयघोष करत 'नाचू किर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' या उक्तीनुसार विवेकाच्या वाटेवर चालत जातात. हैबतबाबांनी ज्या शिस्तीची वारीमध्ये प्रतिष्ठापना केली त्याच शिस्तीत लाखोंचा समुदाय अत्यंत गुण्यागोविंदाने शेकडो मैल अंतर पार करून पंढरपूरी पोचतो. ऊन, वारा, पाऊस झेलत, सुखी संसाराची वाट सोडून तो मार्गस्थ होतो. तुकोबा म्हणाले –

**'संपदा सोहळा नावडे मनाला।**
**लागला टकळा पंढरीचा।**
**जावे पंढरीशी आवडे मानसी।**
**करी एकादशी आषाढी हे।**
**तुका म्हणे असे आर्त ज्याचे मनी।**
**त्याची चक्रपाणी वाट पाहे।।'**

आजच्या व्यसनाधिनतेच्या व मनःस्वास्थ्य बिघडलेल्या जगात पंढरीची वारी खूप मोठा संदेश देते. अनेक उच्च विद्याविभूषित व चिंतनशील लोकांचा ओढा हल्ली वारीकडे लागला आहे. 'झिंग झिंग झिंगाट' आदी गाण्याच्या ठेक्यावर बेधुंदपणे व्यसनाधीन होऊन नाचणाऱ्या आधुनिक पिढीला 'ज्ञानोबा तुकाराम'ची आर्त साद गुणगुणावी वाटेल तेव्हा नक्कीच सामाजिक बदल जाणवेल. प्रतीकं स्वीकारून विचार हरवून गेलेल्या आजच्या पीढीला 'वारी' हा एक इव्हेंट आहे असं वाटतंय. संतसंगती, भक्ती, सकारात्मक विचार, निर्व्यसनीपणा व समता या अजरामर मूल्यांची उधळण करत विवेकाच्या वाटेवर चालणे म्हणजे वारी.

श्रवण, मनन, निदिध्यासन इत्यादी ज्ञानप्राप्तीच्या पायऱ्यांवरून –

**'हे विश्वची माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर।**
**किंबहुना चराचर। आपणची जाहला।।'**

हा ज्ञानेश्वर माउलींचा विश्वबंधुत्वाचा संदेश घेऊन 'Citizen of the World' होण्याचा संकल्प करून आनंदवारीत सहभागी होण्यातच सध्याच्या पीढीचे हित सामावले आहे.

**– प्रा. प्रशांत पु. धर्माधिकारी**

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा

❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण

❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.